म.ग्रं.सं. वाचनालय, ठाणे
विषय : क्रा.वा.
दा. क्र. : १८७६

BVBK-0401876

विषय … बा-ता
दा. क्र. ९८७६

व. द. ताम्बे



जिवाचें मोल द्यायलाहि तो मागेंपुढें पहात नाहीं, हें त्यांना माहीत होतें. म्हणूनच मिर्झाराजांवर विश्वास ठेऊन महाराज आग्ऱ्याला निघाले होते.

बादशहाकडून निरोप आला अन् महाराजाचें प्रस्थान ठरलें. महाराजांनीं स्वराज्याच्या त्या चिमुकल्या मुलुखाची उत्तम व्यवस्था लावली. फाल्गुन शुद्ध नवमीच्या दिवशीं त्यांनीं राजगड सोडला. स्वराज्याचा तो पक्षिराज स्वराज्य सोडून खूप दूर दूर चालला होता. या कल्पनेनेंच राजगड हवालदिल झाला होता. जिजाबाईसाहेबांचे आभाळाएवढें मन भरून आलें होतें. डोळ्यांवाटे आसवांच्या सरी कोसळत होत्या. पण आतां निरोप द्यायलाच हवा होता. अत्यंत जड अंतःकरणानें महाराजांनीं राजगड सोडला.

मिर्झाराजांची इच्छा सफळ झाली होती. त्यांनीं महाराजांच्या वाटेवरच्या प्रत्येक ठाणेदाराकडे भराभर हुकूम पाठविले आणि महाराजांची एखाद्या राजपुरुषाला शोभेशीच तैनात ठेवली जाईल याची खबरदारी घेतली. कारण महाराजांचें मानी मन ते ओळखीत होते. आग्ऱ्याला महाराजांची व्यवस्था मिर्झाराजांनीं आपला पुत्र रामसिंह याच्यावर सोंपविली होती.

महाराजांचा आग्ऱ्याचा प्रवास सुरू झाला. बरोबर नऊ वर्षांचे शंभूराजे होते. हुबेहुब महाराजांसारखा दिसणारा हिरोजी फर्जन्द होता. दत्ताजीपंत होते. निराजी आवजी होते. राघो मित्र, रघुनाथ बल्लाळ क़ोरडे, मदारी मेहतर यांसारखी खाशी मंडळी होती. त्यांची निवड अत्यंत योजनापूर्वक करण्यांत आली होती. साडेतीनशें निवडक मावळ्यांचें एक पथक बरोबर घेतलें होतें. आणखीहि फार मोलाच्या गोष्टी त्यांच्याबरोबर होत्या. त्या म्हणजें भवानीमातेचा आशीर्वाद. जिजाबाईसाहेबांचा आशीर्वाद आणि मिर्झाराजांचा विश्वास.

१२ मे १६६६ या दिवशीं औरंगजेब बादशहाचा पन्नासावा वाढदिवस होता. मोंगलाच्या शहेनशहाच्या अपार वैभवाचें दुनियेला प्रदर्शन करण्याची केवढी तरी संधि औरंगजेबाला मिळाली होती. बादशहाच्या वाढदिवसाच्या निमित्तानें आग्ऱ्याला मोठा थाटमाट

करावयाचा होता. उंची वस्त्रें, सोनें, चांदी, जडजवाहीर यांची खैरात होणार होती. वास्तविक औरंगजेब अत्यंत सनातनी वृत्तीचा, कर्मठ मनाचा होता. वैभवाची ही उधळण त्याला एरवीं पाहवली सुद्धां नसती. पण हा सारा पसारा त्यानेंच हेतुपूर्वक मांडला होता. दख्खनचा 'सेवाजी' राजा यायचा होता ना त्याच्या भेटीला! तेव्हां आपल्या शाही वैभवाचें झगझगीत प्रदर्शन करून त्याचे डोळे दिपवावेत, अशी त्याची जबर इच्छा होती. त्याला हें माहीत नव्हतें कीं, शिवाजीराजा असल्या प्रदर्शनानें दिपून जाणारा नव्हता. शिवाजीराजाचें वैभव काय कमी होतें? पृथ्वीमोलाचीं नररत्नें ज्याच्या पदरीं होतीं, त्याला औरंगजेबाच्या मुगुटांतल्या कांचेच्या तुकड्यांचें काय मोल वाटणार? पण औरंगजेबाला वैभवाचें कौतुक होतें. म्हणूनच तें पहायला शिवाजी वाढदिवसाच्या दिवशींच दरबारांत हजर असावा अशी त्याची इच्छा होती. त्यासाठीं त्यानें शिवाजी महाराजांच्या सर्व प्रवासाची व्यवस्था वेळोवेळीं फर्मानें पाठवून केली होती.

बादशहाचा वाढदिवस अगदीं नजीक येऊन ठेपला. शिवाजी महाराजहि आग्र्याच्या जवळ येऊन पोहोंचले. आग्र्याला एकच धूमधाम चालली होती. सारें शहर शृंगारलें गेलें होतें. घराघरांना रंग चढले होते. सरदारांच्या उंच हवेल्या झगझगूं लागल्या होत्या. नवलाख दिव्यांनीं नगरीं लखलखूं लागली होती. आणि महाराज वाढदिवसाच्या आदल्या दिवशीं आग्र्याला पोंचलें!

वास्तविक शाही रीतिरिवाजांप्रमाणें शाही पाहुण्यांचें स्वागत कोणा तरी मातबर व्यक्तीनें करायला हवें होतें. शिवाजी महाराजांसारखा पाहुणा आग्र्याच्या भूमीवर पाऊल ठेवणार होता. त्या पवित्र पावलांचें स्वागत बादशहाच्या तोलामोलाच्या प्रतिनिधीकडून व्हावयास पाहिजे होतें. पण तें झालें नाहीं. महाराजांना सामोरा गेला तो रामसिंहासारख्या छोट्या मनसबदाराचा साधा कारकून! महाराजांची उतरण्याची व्यवस्था व्हायला हवी एखाद्या खास महालांत. पण ती झाली एका सामान्य धर्मशाळेंत. औरंगजेब

बादशहानें सन्मानानें आमंत्रण देऊन बोलावलेल्या पाहुण्याच्या आदर-सत्काराला अशी सुरुवात झाली!

दुसऱ्या दिवशीं औरंगजेबाचा दरबार भरायचा होता. महाराजांना दरबारांत घेऊन जाण्याचें कामहि रामसिंहावरच सोंपवलेलें होतें. पण तेंहि त्याच्या कारकुनानेंच केलें. पण हे सारे अपमान महाराजांनीं गिळून टाकलें आणि औरंगजेबाच्या 'दर्शना'ला ते सिद्ध झाले. 'अलमगीर' म्हणजे 'दुनियेचा राजा' ही पदवी धारण करणारा तो बादशहा आहे तरी कसा, हें पहाण्याची महाराजांना उत्सुकता लागली होती. त्याच्या भेटीसाठींच तर एवढा खटाटोप होता. मग झालेले अपमान गिळायला नकोत का?

परंतु स्वागताच्या या घालमेलींत महाराजांचा मुख्य थाटाचा दरबार हुकलाच. नंतर खास सरदारांच्या दरबारांत महाराजांना बोलावणें आलें. हा दरबार 'दिवाण-इ-खास' ह्या अत्यंत सुंदर, प्रसिद्ध महालांत भरला होता. बादशहाचे खासे सरदार आपापल्या स्थानांवर विराजमान झाले होते. स्वतः बादशहा पंधरा फूट उंचीच्या रत्नजडित तख्तावर आरूढ झाला. जंगली शेर बारा-बारा फूट उंच उडी मारतात हें बादशहाला माहीत होतें. म्हणूनच त्याला भीति वाटली, न जाणों ह्या दख्खनच्या शेरानें तितकी उडी मारून दगा फटका केला तर—?

ह्या खास दरबारांत महाराजांना स्थान मिळालें तें तिसऱ्या प्रतीच्या मानकऱ्याचें. ज्याच्या पायींचें तीर्थ घेऊन बादशहानें स्वतःला पावन करावें, त्या शिवाजी राजाला त्यानें आपल्या तख्तापासून दूर अंतरावर उभें केलें. महाराजांनीं आणि शंभूराजांनीं बरोबर आणलेले नजराणे पेश केलें. मुजरे केले. पण बादशहानें त्या मानाचा मुजऱ्याचा मान लववून साधा स्वीकारहि केला नाहीं. महाराज मनोमन खूप संतापले होते. पण अपमानाची ही मालिका एवढ्यावरच संपणार नव्हती.

बादशहानें आपल्या मोहब्बतींतल्या सरदारांना मानाचे विडे द्यायला सुरवात केली. सर्वांना विडे देऊन झाले. पण महाराज तसेच

उभे होते दरबारांत जसवंतसिंहाच्या मागें. मराठ्यांना पाठ दाखवून आलेल्या जसवंतसिंहाच्याहि मागें. महाराज भयंकर संतापले. त्यांच्या जळत्या नजरेनें औरंगजेबाकडे पाहिलें. औरंगजेबहि त्यावेळीं महाराजांकडेच पाहात होता. हाच तो दख्खनचा शिवाजी भोंसला नाहीं का ?

आणि महाराजांची नजर स्वाभिमानानें चमकत होती. हिंदूंच्या त्या हाडवैऱ्यावर अंगारांचा वर्षाव करीत होती. अन्यायाची चीड आणि सूडाची भावना तिच्यांत धुमसत होती. दरबारांत बोलावून केलेले हे भयंकर अपमान त्यांना असह्य झाले. ते कडाडून ओरडले, " काय त्या पळपुट्या जसवंतसिंहाच्याहि मागें आमची जागा ? हाच आमचा दर्जा काय ? इतक्या दूरवर आम्ही आलों तें काय असा अपमान करून घेण्यासाठीं ? " भर दरबारांत झालेल्या त्या मेघगर्जनेनें सारा दरबार गोंधळून गेला. भीतीची एक अस्फुट लहर वातावरणांतून हळूच गेली. रामसिंह तर पार गडबडून गेला. संतापलेल्या शिवाजी महाराजांना शांत करण्यासाठीं तो त्यांच्याजवळ गेला. त्याला भीति वाटत होती कीं, जर हा पहाडी माणूस भर दरबारांत गोंधळ करूं लागला तर बादशहा काय म्हणेल ? काय करील ? बादशहाच्या सेवेची निष्ठा आणि शिवाजी महाराजांना दिलेलें संरक्षणाचें वचन ह्या दुहेरी शस्त्रांत तो सांपडला होता.

बादशहाला समजायचें तें समजलें होतें. तरीहि त्यानें साळसूदपणानें रामसिंहाला विचारलें, " रामसिंह, काय गडबड आहे ? " बादशहाच्या समोर ब्र काढायची छाती नाहीं कुणाची आणि हजार मैलावरून आलेला हा पहाडी माणूस बादशहासमोर गर्जना करतो ?

" वाटलं तर मला ठार मारा. पण मी बादशहाच्या पुढं येणार नाहीं." असा महाराजांचा खणखणीत बोल कानीं पडतांच बादशहा संतापला. पण उपयोग काय ? शिवाजी संतापला तर आपला जीव घेण्यास मागेंपुढें पहाणार नाहीं ही भीति होतीच. त्यानें दरबार बरखास्त केला.



दरबारांत एकच कुजबुज उठली. महाराजाच्या या साहसाचें कित्येकांना नवल वाटलें. त्यांनीं मनोमन महाराजांचें कौतुकहि केलें. कांहींना संताप आला. कांहीं जण मनांतून घाबरले. पण एकंदरींत झाला हा प्रकार बरा नाहीं झाला, असेंच सर्वांना वाटलें. आतां पुढें काय होणार हा एकच विषय आग्र्यांत ज्याच्या त्याच्या तोंडीं घोळूं लागला.

पुढें काय व्हायचें तें बादशहानें केव्हांच योजून ठेवलें होतें. महाराजांनाहि त्याची जाणीव होती. जाणून बुजूनच त्यांनीं काळाच्या जबड्यांत प्रवेश केला होता. जें जें घडेल तें पूर्वनियोजितच असणार याची त्यांना खात्री होती आणि त्याला तोंड देण्याची त्यांची तयारी होती. इतर तयारीनिशीं सुद्धां ते आग्र्याला आले होते.

महाराज सर्व कांहीं जाणत होते. ते बादशहाकडे भीक मागायास आले नव्हते. बादशहाकडून मिळणाऱ्या मनसबदारीच्या एखाद्या तुकड्यानें त्यांचें समाधान होणार नव्हतें. त्यांना हवें होतें हिंदवी स्वराज्य. त्यासाठीं शक्य तर लढाई टाळून कांहीं राजकारण

साधतां आलें तर तें त्यांना साधावयाचें होतें. म्हणून तर जयसिंहाशीं तहाचें आणि आतां आग्र्याला येण्याचें हें नाटक चाललें होतें. त्यांना बादशहाचें बळ जाणून घ्यायचें होतें. जमल्यास रजपूत सरदारांशीं मैत्रीहि करायची होती. शंभू राजांना दरबारी थाटमाट दाखवायचा होता. भावी हिंदवी साम्राज्याची राजधानी त्यांच्या नजरेखालीं घालायची होती आणि शिवाय उत्तरेंतील तीर्थक्षेत्रांना भेटीहि द्यावयाच्या होत्या. असे कितीतरी हेतु मनांत बाळगून ते आले होते. तरीपण त्यांना ठाम माहीत होतें कीं आपण मृत्यूच्या जबड्यांत प्रवेश करतों आहोंत !

दुसऱ्या दिवशीं महाराज दरबारांत गेले नाहींत. बादशहानें चौकशी केली तेव्हां त्याला कळलें कीं त्यांना ताप आला आहे. त्या कावेबाज बादशहानें हा ताप कसला आहे तेव्हांच ओळखलें. दरबारांतील राजनिष्ठ सरदारांनीं आणि औरंगजेबाच्या मामीनें बादशहाच्या कानांत सारखी कुजबुज चालविली होती. त्यांनीं एकच टुमणें लावलें होतें कीं, 'शिवाजी आयता हातीं आला आहे. त्याला मारून टाका.' बादशहा बोलत नव्हता. पण त्याच्या मनांत मात्र तेंच होतें. पण रजपुतांनीं महाराजांना अभय दिलेलें असल्यामुळें त्यांना कपटानें मारलें तर रजपूत बिथरतील हा एक फार मोठा धोका होता. तेव्हां तूर्त कांहीं काळ थांबणें जरूर होतें. 'पण मग शिवाजीला मोकळें सोडायचें ? छे, छे ! ते तर फारच वाईट ! त्या दगाबाज सेवाजीला मोकळें सोडून कसें चालेल ?'

बादशहाची योजना तयार होती. कपटी माणसानें वरकरणीं प्रेमाचें कितीहि सोंग आणलें, तरी त्याची कपटीं कारस्थानें चालूच रहातात. शिवाजीला मारूं नये, असें वरकरणीं बादशहानें कितीहि म्हटलें तरी त्याचें कपटी मन त्याला मारण्याच्याच योजना आंखीत होतें. बादशहापाशीं रादअंदाजखान नांवाचा एक दुष्ट आणि क्रूर सरदार होता. त्याच्या बंगल्यांत महाराजांची रहाण्याची व्यवस्था करण्यांत आली होती. याच माणसाच्या बंगल्याची निवड कां केली, हें काय सांगावयास पाहिजे ? शिवाजीची नीट व्यवस्था (!) लावण्याचें हुकूम खानाला देण्यास बादशहा विसरला नव्हता.

बंगल्याबाहेर पोलादखानाचा कडक पहारा बसविण्यांत आला होता. हा पोलादखानहि नांवाप्रमाणेंच पोलादी पुरुष होता. दोघेहि खान खवीस होते.

रामसिंहाला या योजनेचा नीट अंदाज आला होताच. त्यानें महाराजांच्या रक्षणाचें कंकण हातीं बांधलें होतें. महाराजांना कांहीं दगाफटका होईल, या संशयानें त्यानें आपलेहि कांहीं रक्षक त्या बंगल्याभोंवतीं ठेवून दिले होते.

असेच कांहीं दिवस निघून गेले. बादशहाची मगरमिठी महाराजांना असह्य होऊं लागली. एक दिवस कळस झाला. आपल्याला ठार मारण्याचा कट बादशहा रचीत आहे, याचा महाराजांना सुगावा लागला. बादशहाच्या कपटाचा त्यांना दाट संशय आला. त्याच्या जाळ्यांतून सुटका होणें महाकठीण आहे, ह्या विचारानें ते हैराण झाले. रात्रंदिवस ते एकाच गोष्टीचा विचार करूं लागले आणि ती म्हणजे ‘सुटका – बादशहाच्या कैदेंतून सुटका!’

एक दिवस महाराजांनीं आग्र्यांतील प्रमुख सरदारांना मिठाईचे पेटारे पाठविले. एक दिवसच नव्हे तर रोजच मिठाईचे पेटारे महाराजांच्या कोठडींत येत आणि आग्रा शहरांतील निरनिराळ्या



सरदारांकडे रवाना होत. राजअंदाजखानानें प्रथम प्रथम पेटारे करून तपासले. पण त्यांत मिठाईशिवाय कांहींच आढळलें नाहीं. त्यामुळें हे पेटारे पाठवण्यांत शिवाजी कांहीं गैर करतो आहे असें त्याला वाटलें नाहीं. साहजिकच कांहीं दिवसांनीं ते पेटारे तपासण्यांत ढिलाई होऊं लागली.

इकडे महाराज भयंकर आजारी पडले! राजअंदाजखानाच्या पहारेकऱ्यांना महाराजाचें कण्हणें ऐकूं येऊं लागलें. एक दिवस तर महाराज अत्यवस्थ झाले! त्या दिवशीं मिठाईचे पेटारे आले आणि मृत्युमुखीं पडलेल्या (?) महाराजांनीं त्यांना आपल्या हातानें स्पर्श केला आणि ते आग्रा शहराची वाट चालूं लागले. पहारेकऱ्यांनीं पहिले पेटारे तपासले, त्यांत मिठाईच होती. बाकीचे पेटारे त्यांनीं तसेच जाऊं दिले. आणि महाराज बादशहाच्या त्या कपटी कैदेंतून निसटले! मराठ्यांच्या राजा केवढ्यातरी दिव्यांतून बाहेर पडला!

संध्याकाळपर्यंत महाराजांच्या कोठडींतील पलंगावर हिरोजी फर्जंद झोंपून होता, कण्हत होता. संध्याकाळच्या सुमारास तो उठला अन् 'महाराजांसाठीं औषध आणायला' निघून गेला. गेला तो गेलाच. महाराजांचें सोंग घेऊन त्या कोठडींत राहण्यांत त्याच्या जिवाला केवढें तरी भय होतें. पण किती झालें तरी हिरोजी हा महाराजांचा सच्चा सेवक होता. महाराजांचे प्राण वांचवण्यासाठीं आपला जीव ओवाळून टाकण्यास तो हंसत हंसत तयार झाला होता. पण मृत्यूनें आपला फांस सैल केला आणि हिरोजी त्यांतून निसटला!

मजल दरमजल करीत महाराज आपल्या साथीदारांसह स्वराज्यांत येऊन पोंहोचले. जिवावरच्या संकटांतून साहसाच्या जोरावर बचावलेल्या आपल्या लाडक्या राजाच्या आगमनानें महाराष्ट्रांत हर्षाची लाट उसळली. महाराजांच्या विलक्षण साहसाचें घरोघर कौतुक होऊं लागलें. शाहिरांचे डफ फडफडूं लागले. काळाच्या जबड्यांत धाडसानें शिरून तेथून युक्तीनें निसटलेल्या शिवाजी महाराजांचा हा पराक्रम गाण्यांत शाहिरी वाणी धन्यता मानूं लागली.

✦ ✦ ✦



## • २ • कोंडाण्यावरील सिंहपराक्रम

महाराजापेक्षांहि त्यांच्या आईसाहेबांचें जिजाबाईचें-मन मोंगल बादशाहीवर जास्त जळत होतें. कारण स्वराज्य ही मूळची आई-साहेबांची महत्त्वाकांक्षा आणि प्रेरणा होती. त्या स्वराज्याच्या गळ्याला नख लावूं पाहणाऱ्या शत्रूवर त्यांनीं कां जळूं नये?

आईसाहेब राजगडावर रहात होत्या. गडावरून समोरच चार-सहा कोसांवर असलेला कोंडाणा किल्ला त्यांना रोज दिसे आणि त्यांचे डोळे पाणावत. त्या गडावर त्यांनीं बराच काळ घालविला होता. त्या प्रचंड आणि अवघड किल्ल्यावर त्यांचा विलक्षण लोभ होता. शिवबाचा बादशहाशीं झालेला तह मोडला याचा आनंद आईसाहेबांच्याइतका दुसऱ्या कुणालाहि झाला नाहीं. एके दिवशीं त्या शिवबाला म्हणाल्या, "शिवबा, माझें तूं नेहमीं ऐकतोस. मग आज एक गोष्ट ऐकशील?" शिवबांनीं चकित मुद्रेनें त्यांच्याकडे पाहून म्हटलें, "मासाहेब, असं कां विचारतां? आपण सांगितलेली कोणती गोष्ट शिवबानें ऐकली नाहीं आजपर्यंत?"

"तसं नव्हे रे, पण जरा अवघड गोष्ट आहे म्हणून विचारलं."

" आपण सांगाच तर मग." महाराजांनीं आग्रह धरला.

" शिवबा, हा एवढा समोरचा किल्ला मला जिंकून दे." आईसाहेब म्हणाल्या.

" ठीक आहे. " असें म्हणून महाराज उठले; पण थोडे चिंताग्रस्तच !

महाराजांनाहि कोंडाणा हवाच होता. कारण तो त्यांचा ' सिंहगड ' होता. स्वराज्याची राखण अशा अभेद्य किल्ल्यांवांचून अन्य कोण करणार ? या गडावर साऱ्यांचीच नजर असे. विजापुरकरांची आणि मोंगलांची सुद्धां. महाराजांच्या स्वराज्यांत तो फार पूर्वींच आला होता. पण दोनदां तो त्यांना देऊन टाकण्याची पाळी आली. एकदां विजापूरकरांना आणि नंतर पुन्हां मोंगलांना. आतां तो मोंगलांच्याच ताब्यांत होता. आणि महाराजांच्या मनांतहि तो परत घेण्याचेच विचार चालले होते.

पण कोंडाणा परत घेणें ही गोष्ट फार अवघड होती. मुळांत गड अतिशय बळकट होता आणि त्यांत सध्यांचा त्याचा किल्लेदारहि तितकाच बळकट होता. अतिशय शूर आणि कर्तबगार अशी त्याची ख्याति होती. किल्ल्यावरील बंदोबस्त त्यानें अगदीं कडेकोट ठेवला होता. त्याच्या हाताखालीं पंधराशें शूर रजपुतांची शिबंदी होती. किल्ल्यावर भरपूर दारुगोळा होता. तोफा आणि बंदुकाहि भरपूर होत्या. असा हा भक्कम किल्ला घेण्याचें काम कोणाला सांगावें ?

महाराजांनीं खूप विचार केला. सगळीं शूर आणि पराक्रमी माणसें त्यांनीं डोळ्यांपुढें उभीं केलीं. पण मनाची निवड होईना. असा जबरदस्त किल्ला घ्यावयास तसाच जबरदस्त गडी हवा. आणि बराच विचार केल्यानंतर त्यांनीं एका वीराग्रणीची मनांत निवड करून टाकली. तो वीरपुरुष कोणी लहानसहान असामी नव्हती; चांगला भक्कम आणि थोराड अंगाचा, तिखट तलवारीचा आणि निधड्या छातीचा पुरुष होता तो. पण त्याहिपेक्षां महाराजांच्या जिवाला जीव देणारीं जीं लाख लाख मोलाचीं माणसें त्यांच्याभोंवतीं होतीं, त्यांच्यांतीलच एक होता तो. त्याचें नांव तानाजी मालुसरे.

महाडजवळ उंबरठ्याचा रहाणारा. महाराजांच्या जिवाभावाचा. अगदीं बाळपणापासूनचा त्यांचा संवगडी. महाराजांनीं तानाजीला ही कामगिरी सांगण्याचें ठरविलें.

मग महाराजांनीं तानाजीला भेटीसाठीं गडावर बोलावलें. तानाजीबरोबर त्याचा धाकटा भाऊ सूर्याजी हाहि होता. महाराजांनीं आपल्याला कां बोलावलें असेल, याची त्याला कांहींच कल्पना नव्हती. खरें म्हणजे तानाजी यावेळीं उंबरठ्याला आपल्या मुलाचें, रायबाचें लगीन करण्याच्या घाईंतच होता. रायबाच्या लग्नाची अक्षत घेऊन तो होऊनच महाराजांकडे यावयाचा होता. पण महाराजांचें बोलावणेंच आलें, तेव्हांकांहीं तरी बरेंच महत्त्वाचें काम असलें



पाहिजे असें समजून तो ताबडतोब गडावर आला. महाराज आपल्या महालांत एकटेच बसले होते. तानाजीचीच वाट पहात असावेत बहुधा. तानाजी आंत आला. त्यानें वाकून महाराजांना मुजरा केला. महाराज म्हणाले, "या तानाजीराव, बसा. आपल्या रायबाच्या लग्नाचें कुठपर्यंत आलें आहे ?"

तानाजीनें उत्तर दिलें, "ही अक्षतच द्यायला आलुंया नव्हं का. पर तें व्हाऊं द्या तूर्तास. कसला मनसुबा रचतायसा ?"

महाराज कांहीं बोलले नाहींत. ते कसल्या तरी विचारांत असावेत. तानाजीनें ओळखलें, राजाच्या मनांत कांहीं तरी खटकतें आहे. राजाला कांहीं तरी हवें आहे.

इतक्यांत आईसाहेबहि तिथें आल्या. महाराज तानाजीला म्हणाले, "गड्या, तो समोरचा कोंडाणा हवाय् मला. आईसाहेबांच्या ओटींत घालायचा आहे."

तानाजी लगोलग आवेशानें म्हणाला, " मग काळजी कशाला ? मी घेतों गड." आणि महाराजांचा चेहरा खुलला. तानाजी त्यांच्या मनांतलेंच बोलला होता. आईसाहेबांनाहि खूप खूप बरें वाटलें.

तानाजीनें विडा उचलला. आणि आईसाहेबांनीं आणि महाराजांनीं त्याला प्रेमानें निरोप दिला. त्याच्या पाठमोऱ्या आकृतीकडे ते कितीतरी वेळ पहात राहिले. आणि 'धन्य माझा तान्हा' असे उद्गार सहजपणें त्यांच्या तोंडांतून बाहेर पडले.

तानाजी आपल्या गांवीं परत आला. घरीं सगळें वऱ्हाड जमलें होतें. सगळेजण त्याच्याच येण्याची वाट पाहात होते. त्याच्या उत्सुक नजरांना नजर देत तानाजी हंसऱ्या मुखानें म्हणाला, " निघालों आम्ही स्वारीवर. मंडळी, हें लगीन ऱ्हाऊं द्या आतां. आधीं लगीन कोंडाण्याचं आन् मग रायबाचं." स्वामी-कार्याची केवढी ही तळमळ ! त्यासाठीं केवढा हा त्याग !

झालें. स्वारीची सगळी तयारी झाली. निवडक पांचशें मावळे घेतले. सांगातीं सूर्याजी येणार होताच. दिवस नक्की ठरला. माघ वद्य नवमी ! मध्यरात्रीची वेळ ठरविण्यांत आली. रायाजीनें कोळ्यांकडून किल्ल्याची सर्व माहिती मिळविली. सगळी योजना पक्की झाली आणि तानाजीराव स्वारीवर निघाले.

◆ ◆ ◆



कोंडाणा किल्ला केवढा प्रचंड ! सह्याद्रीच्या आभाळाला भिडू पाहणाऱ्या शिखरावर बसलेला. त्याच्या सर्व बाजूंना उंच आणि सरळ कडे उभे होते. गड चढायला अति अवघड आणि त्याला

दरवाजेहि दोनच होते. पुणेंदरवाजांत उभें राहिलें कीं पर्वतीच्या पायथ्याशीं वसलेलें चिमुकलें पुणें दिसावें. कल्याणदरवाजा उघडला कीं, खेड-शिवापुराचा परिसर डोळ्यांना दिसावा. एवढेच दोन दरवाजे पण तटबंदी मात्र चिरेबंदी आणि भक्कम होती. गडावरचे बुरुज उंच आणि धडधाकट. सहजासहजीं शत्रूच्या तोफगोळ्यांना दाद द्यायचे नाहींत असे. गडाच्या या तट-बुरुजांवर सतत जागता पहारा असे. पण पश्चिमेकडची बाजू मात्र मोकळीच होती. तिथें पहारा नव्हता कीं तटबंदीसुद्धां नव्हती. असें कसें काय? कारण तिथें एक नैसर्गिक कडा होता. तो एवढा उंच होता कीं त्यावरून खालीं पाहिलें तर डोळेच फिरत. भंवतीं किर्रर्र रान होतें. अगदीं भयाण होता तो डोणागिरीचा कडा. आणि म्हणूनच दिवसां-रात्रीं केव्हाहि तिकडून शत्रूची चढाई होण्याची भीति नव्हती. गडाच्या बाहेरच्या डोंगरभागांतहि ठिकठिकाणीं नाकीं होतीं. सगळीकडे सारखी गस्त चालू असे. इतका कडक बंदोबस्त असतांना शत्रूच्या आक्रमणाचें भय काय?

डोणागिरीच्या कड्याकडील बाजू मोकळी होती हें खरें. पण त्या बाजूनें गडावर चढणार कोण? सामान्य माणसाच्या हातून कांहीं ही गोष्ट घडण्यासारखी नव्हती. सामान्य माणूस त्या बाजूला फिरकला नसता. डोणागिरीच्या कड्याखालीं भयंकर खोल दरी होती. तिच्यांतील कांटेरी झाडाझुडपांत सापकिरडांनीं वस्ती केली होती. पाठीवर घर घेऊन फिरणाऱ्या विंचवांची वर्दळहि कांहीं कमी नव्हती. अधूनमधून उठणाऱ्या वाघाच्या डरकाळ्यांनीं त्या भयाण शांततेचा भंग होई. त्यामुळें तिथलें वातावरण अधिकच भयाण होई. परंतु गड चढून जायला तानाजीनें हीच बाजू पसंत केली!

तानाजीनें डोणागिरीच्या कड्यावरून चढून जायचें ठरविलें. एवढा अवघड कडा चढून जायचें धैर्य दाखविणें ही सामान्य गोष्ट नव्हे. आतांपर्यंत कुणीच तसा प्रयत्न केला नव्हता पण तरीहि तानाजीनें चढाईसाठीं हीच बाजू पसंत केली. कारण या बाजूनें गडाला तट नव्हता. डोणागिरीच्या दरींतल्या भयाण वातावरणाचें

भय त्याला न् त्याच्या शिपायांना नव्हतें. त्या निधड्या छातीच्या वीरांना, त्या दरींतल्या सापकिरडांच्या अस्तित्वाची फारशीं तमाहि नव्हती. महाराजांचीं माणसें होतीं तीं. त्यांना कशाचें भय?

तानाजीनें असे ५०० धीट मावळे निवडले. माघ वद्य नवमीच्या मध्यरात्रींची वेळ. डोणागिरी निस्तब्धपणें उभा होता. आसमंतांत शुकशुकाट होता. मध्येंच एखाद्या किड्याची किरकिर ऐकूं येई आणि पुन्हां सगळें वातावरण शांत होई. मध्यरात्रीचा एकेक प्रहर उलटूं लागला आणि डोणागिरीच्या आसमंतांत एकेका पावलाचा आवाज उमटूं लागले. हळूहळू सर्व मावळे कड्याखालीं जमले. आणि कड्याच्या वळचणीला उभे राहिले. आतां वर जायचें पण कसें जायचें? तें त्या मावळ्यांना चांगलें माहीत होतें. डोंगर चढण्या-उतरण्याच्या कामांत शिवबाचे मावळे वानरांनाहि मागें टाकतील इतके चपळ होतें. बादशहाच्या खाऊन पिऊन सुस्त झालेल्या सैनिकांना हें कसें जमायचें हो?

प्रथम दोघेतिघे चपळ मावळे कडेकपारींतून वर गेले. त्यांनीं आजूबाजूला नीट न्याहाळून घेतलें. जवळपास कुणी चिटपांखरूंहि नाहीं किंवा इतक्यांत कोणी येऊं शकणारहि नाहीं, अशी खात्री झाल्यावर वरच्या बाजूस पाचरी ठोकल्या. त्यांना जाडजूड शेडे बांधले आणि ते खालीं सोडले. कुणी म्हणतात कीं, ह्या वेळीं तानाजीनें घोरपडीचा उपयोग केला. तुळशीदासाच्या पोवाड्यांत या प्रसंगाचें मोठें बहारदार वर्णन केलें आहे. तें प्रत्यक्ष घडलेलें असो वा नसो पण त्यातून त्या मावळ्याची मर्दुमकी गाजविण्याची ईर्ष्या चांगलीच प्रतीत होते. घोरपड दगडाला घट्ट धरून बसते. दिसावयास हा इवलासा प्राणी. पण एकदां का ती चिटकून बसली कीं तिचें बळ हत्तीलाहि मागें सारील. अशी एक घोरपड तानाजीनें वर सोडली. पण ती थेटपर्यंत वर जाईना. मध्यावर जाई आणि पुन्हा खालीं येई. पुढें काय वाढून ठेवलें होतें, तें तिला समजलें होतें कीं काय कोण जाणें! तानाजी चिडला आणि तो त्या घोरपडीला



दरडावून म्हणाला, "यशवन्ते, आजवर यश दिलंस, म्हणून तुझं नांव यशवन्ती ठेवलं. आतां जर कड्यावरून मागं फिरलीस तर माझ्या पट्ट्यानें तुझीं खांडोळीं खांडोळीं करीन आणि भाकरी-च्या तुकड्यासंगं खाऊन टाकीन. समजलीस!" त्या-बरोबर ती पुन्हा वर गेली आणि कपारींत नखें रोवून बसली. तिच्या कमरेला बांध-लेल्या जाडजूड दोरावरून तानाजी प्रथम चढून गेला. त्यानें वर जाऊन मेखा ठोकल्या आणि त्यावर रोडे बांधून ते खालीं सोडले. त्यावरून सगळे मावळे सपासप वर चढून गेले.

इतक्यांत किल्ल्यावरच्या पहारेकऱ्यांना मावळ्यांच्या ह्या हाल-चालीची कांहींतरी चाहूल लागली. त्यांनीं मशाली पेटवल्या आणि ते पाहूं लागले. तोंच मावळे वर चढून आल्याचें दिसलें. तावडतोब किल्लेदाराला कळविण्यांत आलें. आणि सर्व किल्ला जागा झाला. शत्रू बेसावध नव्हता. एका इशाऱ्यांतच गडावरील सर्व रजपूत आणि पठाण सैनिक पोषाख चढवून आणि शस्त्र हातांत घेऊन लढाईस सज्ज झाले. आपले मावळे वीर चढून आल्यावर विश्रांति घेत

बसले नाहींत. त्यांना सर्व सूचना आगाऊच मिळालेल्या होत्या. त्याबरहुकूम ते तावडतोब कामास लागले. वर चढल्याबरोबर त्यांनीं कापाकापीलाच सुरुवात केली. कांहीं क्षणांतच गडावर तुंबळ युद्ध सुरू झालें.

गडावर १५०० योद्धे होते. आणि मावळे होते फक्त ५००. त्यांना पंधराशेंना तोंड द्यायचें होतें. पण एकेक चौघां रजपूत योद्ध्यांना लोळवील इतका जबरदस्त होता. मराठ्यांचा हा अचानक हल्ला आलेला पाहून किल्लेदार उदयभानू संतापानें बेभान झाला. त्याला हें समजेना कीं गडावर इतका कडेकोट बंदोबस्त असतांना हे मावळे वर आलेच कसे? पण मराठे वीरांच्या ठिकाणीं असलें असामान्य सामर्थ्य कोणत्या गोष्टींमुळें निर्माण होतें हें, परक्यांच्या गुलामगिरींत जन्म घालवणाऱ्या उदयभानूला कळावें कसें? तो मराठ्यांना लाखोली वहातच त्यांच्यावर तुटून पडला. एकीकडे आपल्या सैनिकांना, 'काटो सैतानोंको, मारो' अशा आज्ञा तो देतच होता. पण मावळे कांहीं शेळ्यामेंढ्यांसारखे मरावयास गडावर आले नव्हते. त्यांच्या तलवारींची धारदार पातीं जो समोर येईल त्याचें मुंडकें सपकन् उडवून टाकीत होतीं. लढतां लढतां कांहीं जखमी



होत होते, कांहीं मरत होते, पडत होते. पण शत्रूच्या मानानें पडणाऱ्या मावळ्यांची संख्या फारच थोडी होती. थोड्याच वेळांत त्या लढाईनें भयंकर उग्र स्वरूप धारण केलें.

तानाजी आणि उदयभानू समोरासमोर आले. पेटत्या नजरांची टक्कर झाली. आणि ते दोन्ही नरव्याघ्र चवताळून एकमेकांवर चालून गेले. तलवारींचा खणखणाट होऊं लागला. दोघेहि एकमेकांना हाणून पाडण्याचा कसोशीनें प्रयत्न करीत होते. त्यांचीं तीं पहाडी शरीरें पाहून दोन काळेकभिन्न मेघ टकरा देताहेत असें वाटत होतें. त्यांच्या तलवारी इतक्या वेगानें फिरत होत्या कीं, त्यामुळें काळ्या मेघखंडांतून कडाडणाऱ्या विजेचाच भास व्हावा. क्षणाक्षणानें काळ पुढें चालला होता आणि तानाजी-उदयभानूंचें द्वंद्व अधिकच गति घेत होतें, सारखें असें वाटें कीं पुढच्याच क्षणाबरोबर त्यांच्यापैकीं एकाला काळ उचलून नेणार!

इतक्यांत तानाजीची ढाल तुटली. घात झाला! क्षणभर तानाजी मनांत चरकला. दुसरी ढाल कशी मिळणार या वेळीं? उदयभानूला मात्र अधिकच जोर चढला. या संधीचा फायदा घेतल्याशिवाय तो कसा राहील? त्यानें तानाजीवर घावामागून घाव घालायला सुरुवात केली. तानाजीला आपलें मरण डोळ्यांसमोर दिसूं लागलें. पण तरी सुद्धां मरणाच्या भीतीनें कच खायला तो शेळपट नव्हता. अगदीं नजीक येऊन ठेपलेल्या मृत्यूपुढें त्यानें आपलें डावें मनगट केलें. त्यावर तो शत्रूचे घाव झेलूं लागला. त्याचा तो उग्र आवेश पाहून मृत्यूच चरकला. तानाजीवर झडप घालण्याचें धाडस त्यानें केलें नाहीं. तानाजीची तलवार अधिकच जोरानें तळपूं लागली. आणि त्याच्या एका जबरदस्त घावानें उदयभानूचा वेध घेतला! याचवेळीं नेमका उदयभानूचा एक वार तानाजीच्या वर्मीं बसला. दोघेहि कोसळले. दोन प्रचंड कडे तुटून धरणीवर पडले. मग मात्र मृत्यूची भीति पळाली. मोठ्या धीटपणानें त्यानें दोघांभोंवतीं आपला पाश टाकला.

तानाजी पडला आणि मावळे वीर एकदम खचले. ज्याच्या प्रभावी नेतृत्वाखालीं ते लढत होते त्या तानाजीचा लाखमोलाचा प्राण मृत्यूनें हिरावून नेला होता. आता कशासाठीं लढायचें, या विचारानें ते पळूं लागले. पण गडावर एक तेजाचा सूर्य त्या

मध्यरात्रींसुद्धां माध्यान्हीच्या तेजानें तळपूं लागला. पळणाऱ्या मराठे-वीरांकडे पाहून त्याच्या नजरेंत अंगार पेटला होता. तो त्यांना उद्देशून म्हणाला, "पळतां कुठें? थांबा. तुमचा हा बाप इथें मरून पडला आहे. त्याच्या मरणाचा सूड घ्यायचा असेल तर शत्रूचा एकहि शिपाई जिवंत ठेवूं नका." सूर्याजीचा तो आवेश पाहून मावळे वीर मागे फिरले. त्यांच्या अंगांत पुन्हां वीरश्री संचारली. सख्खा, मोठा भाऊ मरून पडला असतांहि ज्याच्या धैर्याची भिंत ढासळली नाहीं त्या सूर्याजीनें तर शौर्याची कमाल केली! पहाट होऊं लागली तसतसा मराठ्यांना जोर चढला. आणि उदयभानूच्या रजपुतांचा धीर खचूं लागला. मराठ्यांच्या वारांनीं ते पटापट मरूं लागले. कित्येक जण वाट फुटेल तिकडे पळत सुटले कित्येकांनीं कड्यावरून उड्या घेतल्या. पहाटेच्या सुमाराला सिंहगडावर हिंदवी स्वराज्याचा भगवा झेंडा डौलानें फडकूं लागला. मराठ्यांनीं गड जिंकला!

राजगडावर शिवाजी महाराज अस्वस्थ मनानें महालांत येर-झारा घालीत होते. रात्रभर झोप नव्हती त्यांना. नजर कोंडाण्याकडे सारखी फिरत होती. पहाटेच्या सुमाराला अचानक कोंडाण्यावर पेटती चूड दिसली. महाराजांनीं ओळखलें, 'तान्ह्यानें गड जिंकला!' महाराजांना धन्य धन्य वाटलें. गडावरची नौबत विजयाचा जयघोष करूं लागली. इतक्यांत कोंडाण्यावरून जासूद आला आणि मुजरा करून महाराजांना म्हणाला, "गड जिंकला महाराज पण तानाजी नाईक आपल्याला सोडून गेले!" महाराजांना गड मिळाला होता, पण त्यांचा बाळपणाचा सवंगडी गेला होता. महाराजांचे डोळे भरून आले आणि वाहूं लागले. गड जिंकल्याच्या आनंदाचीं आसवें एका डोळ्यांतून वहात होतीं तर दुसरा डोळा आपल्या लाडक्या सवंगड्यासाठीं रडत होता! गड हातीं आल्याचा आनंद होता; पण सिंह गेल्याचें दुःखहि अपरिमित होतें!

◆ ◆ ◆



# केवळ फोंड्यासाठीं!

होय, फोंडा मराठ्यांचाच राहिला. पण फोंडा मराठ्याकडे प्रथम आला केव्हां ? कुणी आणला त्याला मराठ्यांच्या राज्यांत ? थोडेसें मागें जाऊन पाहूं या. काय सांगतो इतिहास आपल्याला ?

फोंडा होता विजापूरकराच्या हातीं. छत्रपति शिवाजी महाराजांनीं इ. सन १६६४ त तो प्रथम जिंकला होता. पण तो फार काळ त्यांच्या ताब्यांत राहिला नाहीं. थोड्याच दिवसांनीं विजापूरकरांनीं तो परत जिंकून घेतला. महाराजांना ही गोष्ट अतिशय लागून राहिली होती. कारण फोंडा त्यांना अगदीं मनापासून हवा होता. स्वराज्याची राखण करायला. पश्चिमेकडच्या साऱ्या जगाला स्वराज्याचें सामर्थ्य दाखवायला !

आणि फोंडा म्हणजे स्वराज्याचें मूर्तिमंत सामर्थ्य होतें अत्यंत भक्कम आणि विस्तीर्ण अशा खडकावर उभारलेला फोंडा म्हणजे जडावाच्या कोंदणांत बसवलेली तेजस्वी हिरकणीच. ज्याच्या ताब्यांत फोंडा त्याची हुकमत साऱ्या दख्खनवर. थेट कारवारपर्यंत. शिवाय पश्चिम सागरावर सक्त नजर फोंड्याचीच. या दोन्ही दृष्टींनीं महाराजांना फोंडा हवा होता. म्हणूनच फोंड्यावर त्यांची दृष्टि खिळलेली होती. परंतु मध्यंतरींच्या काळांत अनेक धक्का देणाऱ्या गोष्टी घडल्या. महाराजांना आग्ऱ्याला बादशहाच्या कैदेत

पडण्याची पाळी आली. केवळ महाराज म्हणूनच ते या जिवावरच्या प्रसंगांतून वांचले ! त्यानंतर तानाजीसारखे लाख मोलाचे सवंगडी त्यांना गमवावे लागले. नेताजीसारखा असामान्य पराक्रमाचा त्यांचा सेनापति मुसलमान झाला आणि बादशहाला जाऊन मिळाला. अशा या कितीतरी गोष्टी महाराजांच्या मनाला धक्का देऊन गेल्या. या सर्वांवर कळस म्हणूनच कीं काय महाराजांच्या राज्यारोहणसमारंभाच्या बाराव्या दिवशीं, महाराजांची प्रेममूर्ति, त्यांच्या सर्व कर्तृत्वाची आदिदेवता, त्यांना स्फूर्ति देणारी त्यांची आई त्यांना सोडून गेली. छत्रपतींच्या मस्तकावरील प्रेममय मातृछत्र कायमचें दूर झालें; साऱ्या महाराष्ट्राचा नाथ असलेला शिवबा आईविना पोरका झाला.

तरीहि महाराजांच्या डोळ्यांत फोंड्याचें तें शल्य सलतच राहिलें. महाराजांची आई, त्यांचे संवगडी हे त्यांना स्वतःसाठीं हवे होते; पण, फोंडा साऱ्या स्वराज्यासाठीं हवा होता. स्वराज्यासाठीं आपलीं सारीं दुःखें गिळणें महाराजांना भाग होतें. स्वराज्याचा सुखसोहळा मोठ्या थाटामाटांत पार पडला. आणि लगेच आईसाहेबांची उत्तरक्रियाहि आटपली. आनंदाचें शिखर गांठलें. आणि लगेच दुःखाची परिसीमा झाली. राहिलें कर्तव्य. त्या कर्तव्याच्या जाणिवेनेंच महाराज तावडतोब मोहिमेवर निघाले.

इतक्यांत रोजचेंच एक संकट त्यांच्या मार्गांत आडवें येऊन उभें राहिलें. महाराज आणि त्यांचे मराठे अशा संकटांना सरावलेलेच होते. तीं संकटें बाजूस सारून आपलें हातीं घेतलेलें कार्य तडीस नेण्यांत तर महाराजांचा हातखंडा होता. पण आतां हें जें संकट उभें राहिलें होतें तें आणणारी व्यक्ति नवीनच होती. त्या व्यक्तीचें नांव बहादूरखान. दिलेरखानाच्या जागीं दख्खनचा सुभेदार म्हणून नुकतीच त्याची खास नेमणूक झाली होती. शाहिस्तेखान, दिलेरखान यांच्याच तोलामोलाचा, बादशहाच्या खास मर्जीतला हा सरदार. पराक्रमापेक्षां पोकळ बडबडीबद्दलच याची विशेष ख्याति. मराठ्यांचें राज्य नामशेष करायला आली होती ही स्वारी ! मी मी म्हणणारे

सारे खानसाहेब मराठ्यांना पाठ दाखवून परत गेले होते. आणि आतां हे बहादूरखान बहादुरी दाखवायला आले होते.

बहादूरखानाचा तळ पुण्याच्या पूर्वेस २४ मैलांवर पेडगांव येथें पडला होता. या नवीन सरदाराचें आगमन म्हणजे महाराजांच्या पुढील कार्यक्रमाला एक शुभशकुनच म्हणाना. कारण महाराजांच्या पुढील मोहिमांच्या यशाची मुहूर्तमेढ त्यानें रोवली. महाराजांच्या मनांत आलें कीं, या नवीन खानाला मराठ्यांच्या सामर्थ्याची थोडीशी चुणूक दाखवावी आणि मग पुढें जावें. म्हणून त्यांनीं आपली एक फौज खानावर सोडून दिली. या फौजेचा मुख्य नेता कोण होता, हें इतिहासानें सांगितलेलें नाहीं. पण तो महाराजांच्या खास विश्वासांतला असला पाहिजे, हें तर उघड आहे.

त्यानें आपल्या फौजेच्या दोन टोळ्या केल्या. एक छोटीशी आणि एक मोठी. छोट्या टोळीला खानावर चालून जाण्यास सांगितलें आणि मोठी टोळी थोड्या अंतरावर आड बाजूला ठेवून दिली. मराठ्यांचें सैन्य आलेलें पाहतांच खानानें आपल्या फौजेला त्यांना तोंड देण्यासाठीं पाठविलें. खानाचें सैन्य चालून आलेलें पाहतांच ही टोळी एकदम पळत सुटली.



खानाला वाटलें कीं, मराठे आपल्याला भ्याले. त्याला अधिकच चेव आला आणि त्यानें मराठ्यांच्या त्या टोळीचा पाठलाग जारीनें सुरू केला. आपल्या सैन्यासह तो आपल्या छावणीपासून खूप लांब आला. मराठ्यांच्या मोठ्या टोळीला हें कळलें मात्र, ती विजेच्या वेगानें खानाच्या छावणीकडे दौडत आली. मराठ्यांच्या

छोट्या टोळीमागें जातांना खानानें आपल्या छावणीचा कांहींच बंदोबस्त करून ठेवला नव्हता. त्यामुळें मराठ्यांच्या ह्या मोठ्या टोळीनें खानाची छावणी साफ लुटली. ह्या लुटींत त्यांना रोख एक कोट रुपये, उंच आणि देखणे असे कित्येक अरबी घोडे मिळाले. एवढी प्रचंड लूट घेऊन ही टोळी परत फिरली. पण जातांना खानाच्या छावणीची होळी करायला मात्र विसरली नाहीं.



मराठ्यांच्या छोट्या टोळीचा पाठलाग करून खान दमला आणि मराठ्यांचा नाद सोडून आपल्या छावणीकडे परत फिरला. पण जाग्यावर छावणी नव्हतीच. राखेचे मोठे ढिगारे मात्र होते. तीच राख अंगाला फासून मक्केला निघून जाण्याची वेळ खानावर आली होती !

निराश होऊन खान पेडगांवला एकेक दिवस कंठीत होता. औरंगजेबाचीं त्याला सारखीं पत्रें येत होतीं कीं ‘ मराठ्यांवर स्वारी करा. त्यांना नामोहरम करा.’ नाईलाजानें खानानें पुन्हां तयारी केली. अगदीं जय्यत तयारी केली.

या वेळीं तर महाराजांना फोंडा, कारवारची मोहीम तांतडीनें साधायची होती. अशा वेळीं मधेंच बहादूरखानाशीं लढण्यांत वेळ घालवतां उपयोगी नाहीं, हें जाणून महाराजांनीं त्याच्याशीं तहाचीं

बोलणीं सुरू केलीं. प्रथम खानाला नवल वाटलें. मग तो स्वतःवरच खुष झाला. माझी तयारी पाहून नक्कीच हा शिवाजी घाबरला असला पाहिजे ! महाराजांच्या पत्रानें तर खानाची स्वारी निहायत खुष झाली. महाराजांनीं खानाला लिहिलें होतें कीं, 'औरंगजेब बादशहांनीं आपल्याला माफी करावी. आमचा पुत्र संभाजी यास आम्ही खावंदांचा सहा-हजारी सरदार म्हणून चाकरींत ठेवूं इच्छितों. तसेंच आमच्या ताब्यांतील सतरा किल्ले आम्ही बादशहांस नजर करूं इच्छितों. बादशहांना आम्ही शरण आहोंत. कसेंहि करून बादशहांनीं आमचे मागील सर्व अपराध पोटांत घालावेत आणि आम्हांला आपलें मानावें.'

कशासाठीं महाराजांनीं हें नाटक केलें असेल? त्यांना काय खरोखरीच पश्चात्ताप होत होता? किंवा तसा पश्चात्ताप व्हावा असे बादशहाचे कोणते गंभीर अपराध, असें कोणतें पाप त्यांनीं केलें होतें? उलट हिंदवी स्वराज्याची स्थापना करून केवढें तरी पुण्यकर्मच त्यांनीं केलें होतें. मग ही क्षमायाचना कशासाठीं?

पण महाराज मोठे मुत्सद्दी आणि राजकारणी होते. एकाच वेळीं दोन आघाड्यांवर लढत रहाणें, हें धोक्याचें असतें, हें त्यांना माहीत होतें. बहादूरखानाला ते मुळींच भीत नव्हते. परंतु त्यांना आधीं फोंडा हवा होता. त्यासाठीं त्यांना विजापूरकरांशीं मुकाबला करायचा होता. त्याच वेळीं मोंगलांशीं वैर ठेवून चालण्यासारखें नव्हतें.

महाराजांनीं बहादूरखानाचें पाणी तेव्हांच ओळखलें होतें. त्याच्याशीं झडलेल्या पहिल्याच सलामींत महाराजांना हें स्पष्ट कळून चुकलें कीं खानाचा तिसरा मजला शाबूत नाहीं ! तो जर असता तर खान एक कोटी रुपयांची संपत्ति पेडगांवच्या छावणींत उघड्यावर टाकून मराठ्यांच्या मागें पळत सुटला नसता. तेव्हां त्याच्या बेअकली-पणाचा पुरेपूर फायदा घेण्याचें महाराजांनीं ठरविलें. वरील नाटकाचा व्हायचा तोच परिणाम झाला. प्रथम खान गोंधळला, गडबडला. पण मग त्याला स्वतःच्या करामतीचें फार कौतुक वाटूं लागलें. काय करामत केली होती खुदा जाणे !

एवढा बिलंदर शिवाजी आपल्याशीं तह करायला निघाला

यांतच आपलें सारें कर्तृत्व आहे असें खानाला वाटूं लागलें. आणि त्याचें मन भविष्यांत पूर्णपणें रंगून गेलें. बादशहा आपल्यावर निहायत खुष झाला आहे; भर दरबारांत आपल्याला सर्वश्रेष्ठ मानाची जागा मिळाली आहे; सर्व सरदारांकडून आपल्यावर स्तुतीचा वर्षाव होत आहे; राजधानींत जिकडे तिकडे आपलेंच नांव ऐकूं येत आहे; अशीं गोड गोड स्वप्नें तो पहात होता.

पण महाराज करणार होते त्याचा खरा मामा ! त्याला तें कळत नव्हतें, ही महाराजांची खरी करामत. त्यांची नजर होती फोंड्यावर आणि म्हणून खानाला शांत राहूं देणें जरूर होतें. आपण पाठवलेला तहाचा हा अर्ज बादशहाकडे जाईल आणि बादशहाकडून त्याला मान्यता मिळेल ही गोष्ट कदाचित् शक्य असली, तरी हें सर्व घडण्यास तीन-चार महिन्यांचा काळ तरी जाईल. एवढा काळ फोंडा घेण्यासाठीं हवाच होता. म्हणून तर त्यांनीं हें सर्व नाटक रचलें.

इकडे बहादूरखान पेडगांवच्या आपल्या छावणींत सोनेरी स्वप्नें पाहण्यांत दंग होऊन राहिला होता. आणि तिकडे महाराजांनीं आपली फौज फोंड्याकडे रवाना केली होती ( एप्रिल १६७५).

महाराजांच्या फौजेंत पंधरा हजार घोडेस्वार व चौदा हजार पायदळ होतें. फोंड्याकडे जातांना वाटेंत त्यांनीं कोल्हापूर जिंकून घेतलें आणि ते तेथून तडक फोंड्याकडे निघाले.

वास्तविक पावसाळा अगदीं नजीक येऊन ठेपला होता. कोंकणांतला पाऊस महाभयंकर असतो. हत्तीच्या सोंडेसारख्या धारा कित्येक दिवस सतत कोसळत राहतात. तरीपण महाराजांनीं आपला निश्चय पार पाडण्याचें ठरविलें.

महाराजांच्या फौजेनें किल्ल्याला वेढा दिला. या वेळीं किल्ल्यावर महंमदखान या नांवाचा किल्लेदार होता. महंमदखान हा शूर आणि कर्तबगार होता. त्यानें किल्ल्याच्या रक्षणासाठीं अतिशय जय्यत तयारी केली होती. पावसाळा निभावून जाईल इतकी धान्यसामग्री किल्ल्यावर होती. शिवाय त्यानें गोव्याच्या पोर्तुगिजांशीं आंतून संधान बांधलें होतें. वास्तविक पोर्तुगीजांचा या लढाईशीं

कांहींहि संबंध नव्हता, महाराजांनीं पोर्तुगीजांचें कांहींहि वांकडें केलेलें नव्हतें. तरीहि पोर्तुगीज महाराजांना आपला शत्रु समजत होते व किल्लेदाराला चोरून मदत करीत होते. महाराजांच्या सैनिकांनीं पोर्तुगीजांच्या हालचालींवर सक्त नजर ठेवून त्यांची मदत किल्ल्यावर पोंचणार नाहीं, अशी आगाऊ व्यवस्था करून ठेवली. तरीहि महंमदखान कचरला नाहीं. त्यानें किल्ल्यावरून महाराजांच्या सैन्यावर जोरदार मारा चालू ठेवला होता.

महाराजांनीं फोंडा वेढला ही बातमी विजापुरांत वाऱ्यासारखी जाऊन पोंहोंचली. वास्तविक आतां महाराजांना तोंड देण्याचें सामर्थ्य विजापूरकरांत उरलेंच नव्हतें. किंबहुना महाराजांना प्रतिकार करायचा म्हणजे विजापूरच्या सरदारांच्या उरांत धडकीच भरे. जे उरले सुरले सरदार तिथें होते, त्यांपैकीं बहुतेकांनीं महाराजांच्या हातचा प्रसाद केव्हां ना केव्हां तरी खाल्लेला होता.

शेवटीं हो ना करतां करतां बहलोलखान नांवाचा एक मोठा सरदार फोंड्याच्या मदतीला निघाला. महाराजांना याची कल्पना होतीच. त्यांनीं आपली एक टोळी मिरजेजवळ त्याला अडविण्यासाठीं ठेवून दिली. या टोळींतील लोकांनीं आपल्या नेहमींच्या शिरस्त्याप्रमाणें खानाच्या सैन्यावर छुपे हल्ले करून त्याला अगदीं बेजार करून सोडलें. मराठ्यांच्या ह्या हल्ल्यामुळें खानाला पुढें येणें अशक्यच झालें आणि तो मिरजेला स्वस्थ बसून राहिला.

किल्लेदार महंमदखान मराठ्यांच्या वेढ्याला मोठ्या धैर्यानें तोंड देत होता. गडावर सांठवलेली धान्यसामग्री संपत आली होती गडाचें रक्षण करणारीं माणसें हळूहळू कमी होत चाललीं होतीं. तरीहि न डगमगतां तो निकरानें झुंजत राहिला होता.

शेवटीं महाराजांनीं एक धाडसी योजना आंखली. फोंड्यावर चढून जाण्यासाठीं त्यांनीं पांचशें शिड्या तयार केल्या. या शिड्यांवरून एकाच वेळीं पांचशें माणसांनीं किल्ल्यावर चढून जाणें ही काय सोपी गोष्ट होती? वरचे सैनिक कांहीं झोंपलेले नव्हते. त्यांच्याकडून गोळ्यांचा सतत वर्षाव चालू राहणार होता. तरीपण महाराजांनीं आपल्या शूर सैनिकांच्या धाडसाला आवाहन केलें. 'शिडी चढून जाणाऱ्या प्रत्येक वीराला एकेक सोन्याचें कडें बक्षीस दिलें जाईल,'



असेंहि त्यांनीं जाहीर केलें. वास्तविक या बक्षिसाची लालूच दाखवण्याचीहि गरज नव्हती. कारण महाराजांचीं माणसें होतीं तीं. महाराजांसाठीं आणि स्वराज्यासाठीं आपल्या प्राणांची कुर्बानी करण्याचा धर्म त्यांनीं स्वीकारला होता. महाराजांच्या तोंडून फक्त शब्द येण्याचाच अवकाश होता. शिड्या चढून जाण्यासाठीं त्यांच्यांत चुरस लागली. पांचशेंच काय, पंधराशें माणसें हां हां म्हणतां शिड्या चढून वर गेलीं, किल्ल्यांत घुसलीं आणि तेथील सैनिकांची कत्तल करून त्यांनीं किल्ला सर केला. किल्लेदार महंमदखान मराठ्यांचा कैदी झाला!

फोंड्यावर पुन्हां भगवें निशाण मोठ्या डौलानें फडकूं लागलें. महाराजांची फत्ते झाली. त्यांच्या योजनेप्रमाणें कारवारपर्यंतचा सर्व प्रदेश ते ताबडतोब काबीज करूं शकले.

तिकडे औरंगजेबाकडून तहाला मान्यता मिळाली. बहादूरखानाला अतिशय आनंद झाला. आणि महाराजांना ? त्यांना कुठें हवा होता तो तह ? तहाचें नाटक संपलें होतें. त्यांना फोंडा मिळाला होता. त्यांनीं तह धुडकावून लावला आणि बहादूरखानाची मात्र मधल्यामधें नाचक्की झाली! कारण महाराजांनीं तें नाटक केलें होतें-केवळ फोंड्यासाठीं!

✦ ✦ ✦

शाखा.
दा. क्र. ९८७६ दिनांक १२।१।८६
विषय



# केवळ नशिबानें वांचविलें !

पावसाळा संपत आला होता. नव्याचें तेज सृष्टिदेवीच्या मुखावर झळकूं लागलें होतें. तिनें परिधान केलेल्या हिरव्या शालूवर आतां सोनेरी झांक चमकूं लागली होती. सारें जग कसें अगदीं प्रसन्न प्रसन्न होतें. त्यांतहि कोंकणची प्रसन्नता कांहीं आगळीच.

कोंकणची भूमि म्हणजे दुसरें नंदनवनच जणुं ! त्यांतहि कोंकणचा दक्षिण भाग विशेषच सुंदर आणि रमणीय ! या प्रदेशावर आतां शिवाजी महाराजांचें राज्य होतें. महाराजांनीं कोंकण जिंकलें आणि ती भूमि स्वराज्यांत येऊन पावन झाली. महाराजांचे पाय परशुरामाच्या ह्या पवित्र भूमीला न लागते तर ह्या रम्य प्रदेशाला स्मशानाची अवकळा आली असती !

सह्यगिरीच्या डाव्या कुशीच्या आधारानें लांबच लांब पसरलेल्या ह्या भूपट्टयाला परकीयांच्या आक्रमणांचे तडाखे कांहीं थोडे

थोडके बसले नव्हते. तिकडे उत्तर टोंकाला जंजिऱ्याचा सिद्दी आणि दक्षिण टोंकाला गोव्याचा फिरंगी पक्कें ठाण मांडून बसले होते. जेव्हां जेव्हां त्यांना संधि मिळे तेव्हां तेव्हां ते हा प्रदेश अगदीं क्रूरपणानें झोडपून काढीत. एवढ्याशा ह्या चिमुकल्या प्रदेशानें भारी मार खाल्ला होता ह्या दोघां शत्रूंकडून.

१६८३ सालची गोष्ट. छत्रपति शिवाजी महाराज तीन वर्षांपूर्वीं वारले. फक्त तीनच वर्षें झालीं होतीं त्यांना जाऊन. पण ह्या तीन वर्षांच्या अवधींत त्याच्या ह्या बाळसेदार स्वराज्याला दृष्ट लागली कीं काय एखाद्या नतद्रष्टाची न कळे! संभाजी राजांचें आणि त्यांच्या मुत्सद्यांचें भलतेंच बिनसलें. मुत्सद्यांच्या मनांत राजांच्याविषयीं अविश्वास निर्माण झाला होता. त्यांनीं त्यांच्याविरुद्ध गुप्त कट केले आणि राजारामाला गादीवर आणण्याचें ठरविलें. एकदां तर त्यांचा जीव घेण्याचाहि प्रयत्न झाला. त्यामुळें संभाजी राजे संतापले. सर्व जुन्या मुत्सद्यांची त्यांनीं हकालपट्टी केली. संशयानें त्यांना इतकें घेरलें कीं कोणासहि जवळ करण्यास ते तयार झाले नाहींत. आणि अखेर स्वराज्याच्या ऐक्याला एक तडा गेला.

शत्रूचें फावतें तें अशाच वेळीं. स्वराज्याचा सर्वांत मोठा प्रबळ शत्रु म्हणजे दिल्लीचा मोंगल बादशहा औरंगजेब. शिवाजी महाराजांनीं आग्र्याच्या त्याच्या भक्कम पिंजऱ्याचे ते लोखंडी गज तोडून मोडून टाकले तेव्हांपासून तो मराठ्यांच्या ह्या गोंडस स्वराज्यावर दांत ओंठ चावीत बसला होता. शिवाजी महाराज गेले आणि आतां संभाजीचा हा असा प्रकार! औरंगजेबाच्या आशा इतक्या फुलल्या, इतक्या फुलल्या कीं, त्याला वाटलें कीं आतां एका धक्क्यानें हें स्वराज्य जमीनदोस्त करून टाकतां येईल. मामांच्या हाताचीं बोटें तोडणारा तो 'सैतान सेवाजी' आतां गेलाच होता. तेव्हां आतां स्वतःच स्वराज्यावर चालून जाण्याला कांहींच हरकत नाहीं. असें ठरवून तो दक्षिणेंत लाख फौजफाटा घेऊन आला आणि औरंगाबादेला तळ देऊन बसला. स्वराज्य चुटकीसरशी मोडून टाकण्याचे त्याचे सर्व डाव येथूनच सुरू झाले.

संभाजी राजे संतापी होते; व्यसनीहि होते—पण पराक्रम आणि साहस ह्या दोन्हीं गुणांच्या बाबतींत ते प्रतिशिवाजीच होते ! प्रत्यक्ष बादशहा महाराष्ट्राच्या—मराठ्यांच्या नाशाला आपल्या सर्व सामर्थ्यांनिशीं येऊन उतरला तरी ते कचरले नाहींत, गडबडले नाहींत. उलट बादशहाला आणि त्यानें उठविलेल्या इतर गिधाडांना नामोहरम करण्याचा त्यांनीं चंग बांधला.



औरंगजेब बादशहा म्हणजे कमालीचा राजकारणी आणि कारस्थानी पुरुष. त्यानें मराठ्यांच्या सर्व शत्रूंना गुप्त खलिते धाडले. त्यांना बक्षिसांची,इनामांची मानाची लालूच दाखविली. लागेल ती मदत देण्याचीं गोड गोड आश्वासनेंहि दिलीं. कांहींहि करून त्यांनीं मराठ्यांच्या स्वराज्याच्या नाशासाठीं बादशाही आघाडींत सामील व्हावें एवढाच त्याचा हेतु. त्यांना तरी दुसरें काय हवें होतें ? आणि एवढा मोठा बादशहा पाठीशीं असतांना भय तरी कसलें ? खुशाल मराठ्यांच्या प्रदेशांत घुसावें आणि मारतां येईल तेवढा त्यांचा मुलुख मारावा असें त्यांनीं ठरविलें.

बादशहाच्या ह्या आघाडींत जंजिऱ्याचा सिद्दी सामील झाला. पोर्तुगीजहि मोठ्या आशेनें आघाडीला येऊन मिळाले. इंग्रजांनींहि आघाडीशीं गुप्तपणें हातमिळवणी केली. असे आणखी कितीतरी लोक या स्वराज्यशत्रूंच्या आघाडींत आले. या सर्वांचा मराठ्यांवर भारी राग होता; कारण यापैकीं प्रत्येकानें मराठ्यांच्या हातचा बेदम मार केव्हांना केव्हां तरी खाल्ला होता. सर्वांचें समान दुःख असें हें एकच होतें.

औरंगजेब बादशहा हा या आघाडीचा सूत्रधार. त्याचा आदेश येतांक्षणींच आघाडींतील एक एक वीर पुढें सरसावला.

प्रथम पुढें आला जंजिऱ्याचा सिद्दी. उत्तर कोंकणांत धुडगूस घालण्यास त्यानें सुरुवात केली. संभाजी राजाच्या कानांवर त्याच्या अत्याचारांच्या बातम्या येऊन थडकल्या मात्र ! संभाजी विलक्षण चवताळला आणि चित्त्याच्या चपळाईनें त्यानें सिद्दीवर चाल करून त्याला पहिल्याच तडाख्यानें जंजिऱ्याच्या खाडींत रेटलें.

इतक्यांत गोव्याच्या फिरंग्यांनीं मराठ्यांच्या फोंडा किल्ल्यावर हल्ला चढविल्याची बातमी त्याच्या कानांवर आली. म्हणून सिद्दीला तसाच ठेवून तो फिरंग्यांच्या समाचाराला त्वरेनें निघाला.

गोव्याचे फिरंगी म्हणजे पोर्तुगीज. मराठ्यांच्या नाशाला ते टपलेलेच होते. फोंड्यावर त्यांचें बरेंच दिवस लक्ष होतें. फोंडा त्यांना हवाच होता. पण तो मिळणार कसा ? शिवाजी महाराजांच्या हयातींत तर ही गोष्ट अगदींच अशक्य होती. अफजलखान, फाजलखान, रुस्तुमजमान, सिद्दीजोहर यांसारखे विजापूरकरांच्या सल्तनींतले अतिरथी आणि शाहिस्तेखान, दिलेरखान, जसवंतसिंग, जयसिंग यांसारखे मोंगल दरबारांतील महारथी यांनीं शिवाजी महाराजांच्या प्रदेशावर टाकलेले हात कसे पोळून निघाले हें त्यांना चांगलेंच माहीत होतें. पण आतां शिवाजी महाराज निवर्तले होते. शिवाय बादशहाचा खलिता आला होता— " तुम्ही संभाजीचा मुलूख खुशाल जिंका. तो आम्ही तुम्हांला बहाल करूं. संभाजीला पकडाल तर मोठें बक्षीस देऊं. त्याला ठार माराल तर काय मागाल तें देऊं."

'वाः, आणखी काय पाहिजे ! संभाजीला पकडायचें ना; तें तर फारच सोपें काम. गोव्याच्या वाळूंतील खेंकडे पकडण्याइतकें सोपें. तो आला मात्र पाहिजे या बाजूला. मग त्याला नक्कीच पकडून दाखवितों. आणि एकदां पकडल्यावर त्याला ठार मारायला कितीसा उशीर ? जिवंत माणसें उगीचच मारून टाकण्यांत आम्ही पोर्तुगीज लोक कोणालाहि हार जाणार नाहीं. अहो, आमच्या त्या गामासाहेबानें ( म्हणजे प्रसिद्ध वास्को-द-गामा ) तुमच्या झामोरीनला शेंकडों माणसांचे हात, पाय, मुंडकीं नजर नव्हतीं का केलीं ? तसे आम्ही पोर्तुगीज फार शूर बरें !'

संभाजीला पकडून ठार मारण्याचे पोर्तुगीजांचे हे सर्व बेत मनांतल्या मनांतच चालले असणार म्हणा. त्यांच्या तोंडावाटे ते बाहेर पडलेले इतिहासाला तरी माहीत नाहींत. कदाचित ते बाहेर पडलेच असले तर ते खचितच विरून गेले असणार. कारण इतिहास फार वेगळीच हकीकत सांगतो.

एवढें मात्र खरें कीं, बादशहाच्या खलित्याचा पुरेपूर फायदा घेण्याचें पोर्तुगीजांनीं ठरविलें होतें. म्हणूनच त्यांनीं फोंड्यावर हल्ला करण्याचा बेत केला.

फोंड्यावर हल्ला करण्याचें आणखीहि एक कारण होतें. संभाजी राजाचे गुप्त हेर गोव्यांत वावरत होते. गोव्याच्या गव्हर्नरला हें समजलें. तो त्यांना गोव्याबाहेर हाकलून देण्याच्या विचारांत होता. इतक्यांत त्या चाणाक्ष हेरांनीं माहितीचें एक पिल्लूं गांवांत सोडून दिलें. 'फोंडा किल्ल्यांत संभाजी महाराजांनीं अगणित संपत्ति सांठवून ठेवली आहे. किल्ल्यावर बंदोबस्तहि नाहीं. तुम्ही आतांच हल्ला करा म्हणजे तुमचा फायदा होईल.'

गव्हर्नरच्या तोंडाला पाण्याचा समुद्र सुटला. पुढें तें पाणी खारटच निघालें आणि तें आटून तेथें वाळवंट तयार झालें ही गोष्ट निराळी ! पण ती माहिती ऐकल्याबरोबर उद्यांचें काम आजच उरकण्याच्या निश्चयानें तो तयारी करूं लागला, हें खरें. त्यानें गोव्यांत होत नव्हते तेवढे सारे पुरुष गोळा केले. त्यांत पाद्री सुद्धां होते. त्या सर्वांना लष्करी पोषाख चढविण्यांत आले आणि त्यांच्या खांद्यावर बंदुका देण्यांत येऊन त्या सर्वांना लढाईवर जाण्याचे हुकूम सुटले. अशी ही ताज्या दमाची जंगी फौज २२ ऑक्टोबर १६८३ रोजीं फोंड्याच्या रोखानें निघाली. फौजेचा सेनापति होता स्वतः गव्हर्नर. फ्रान्सिस टाव्हेरा त्याचें नांव. मोठा घमेंडखोर आणि तितकाच अविचारी. फोंडा घेण्यासाठीं तर अतीच उत्सुक झाला होता तो.

◆ ◆ ◆




फोंडा—कोंकणच्या दक्षिण किनाऱ्यावरील एका प्रशस्त खडकावर बांधलेला हा बळकट किल्ला पूर्वी विजापुरकरांच्या ताब्यांत होता. शिवाजी महाराजांनीं त्याला स्वराज्यांत आणलें. तेव्हांपासून तो स्वराज्याचा खडा पहारेकरीच बनला. पश्चिमेकडून अरबी समुद्राच्या लाटा तो लीलेनें अडवीत होता. बाकीच्या तिन्ही बाजूंना चिरेबंद दगडांची मजबूत तटबंदी तर होतीच. शिवाय त्याच्या सर्व बाजूंच्या बुरुजांवर तोफा ठेवण्यांत आल्या होत्या. किल्ल्यावर चोवीस तास जागता पहारा असे. मुळांतच भक्कम काळ्या खडकावर उभा असलेल्या या किल्ल्यावर साऱ्या कोंकणच्या रक्षणाची भिस्त होती. शिवाजी महाराजांचें या किल्ल्याकडे लक्ष गेलें तें याच त्याच्या नाक्याच्या स्थानामुळें. आणि आतां तो पोर्तुगीजांना हवा होता तोहि याच कारणामुळें.

गडावर गडकरी कोण होता तें माहीत नाहीं. पण जो होता तो महाराजांच्या निवडींतला होता हें काय सांगावयास हवें ? महाराजांची निवडच अशी असे कीं, त्यांच्या निवडीचा एक एक माणूस लाख मोलाचा ठरे. त्याच्या निष्ठेची धार त्याच्या तलवारीच्या धारेसारखीच तिखट असे. त्याचा किल्ला हा त्याच्या पंचप्राणापेक्षांहि त्याला अधिक प्रिय असे. महाराजांनीं मोठ्या विश्वासानें स्वाधीन केलेली ही मोलाची दौलत डोळ्यांत तेल घालून तो जपत असे.

त्याचे साथीदारहि त्याच्यासारखेच प्रखर निष्ठेचे, नेकवाज आणि शूर. संख्येनें फार थोडे होते ते. असतील सुमारें तीनशें. पण होते कसे ? चिरेबंदी भक्कम तट फुटेल पण यांच्या छाताडांची भिंत फोडून किल्ला सर करणें ही गोष्ट अशक्यच होती. अशा पोलादी छात्या आणि त्याच्या आंत तीं पोलादी मनें असतात तेव्हांच स्वराज्याचें रक्षण आणि वर्धन होत असतें. पाद्र्यांच्या पलटणींचें काम नव्हे तें !

पण टाव्हेराला वाटलें कीं फोंडा घ्यायला पाद्र्यांची पलटण पुरेल. तशी त्याची फौज संख्येनें लहानसहान नव्हती. त्या फौजेंत ८०० युरोपियन सैनिक आणि ८००० काळे सैनिक होते. शिवाय पांच प्रचंड तोफाहि होत्या फौजेबरोबर. फोंड्यासारखा छोटासा किल्ला घ्यायला याहून मोठी फौज कशाला हवी ? आणि हवी असली तरी होती कोठें म्हणा !

टाव्हेरानें कूच करण्याची वेळहि योग्य निवडली होती. रात्रींच्या वेळीं अंधारांतून ही फौज मोहिमेवर निघाली आणि थोड्याच



वेळांत ती फोंडा किल्ल्याच्या नजीक आली. कारण गोव्यापासून फोंडा अगदीं जवळ. दोन तीन तासाच्या चालीच्या अंतरावर. किल्ला

तोफांच्या माऱ्यांत आल्यावर फौज थांबली. तोफांचे मोर्चे उभारण्यांत आले. सैन्य जागोजागीं पांगवून ठेवण्यांत आलें. किल्ल्यावर मारा करण्याची सारी सिद्धता झाली.

किल्ल्यावरचे लोक कांहीं झोंपा घेत नव्हते. पहारेकऱ्यांनीं तर पोर्तुगीजांच्या हालचालींची नोंद केव्हांच केली होती. किल्ला पुरता जागा होता. किल्लेदारानें अगदीं शांतपणानें सर्व तयारी करून ठेवली होती. सर्व तोफा ठांसून ठेवल्या होत्या. पोर्तुगीजांच्या बारीकसारीक सर्व हालचालींहि त्याची तीक्ष्ण नजर टिपून घेत होती. आतां पोर्तुगीज आपल्या तोफांना बत्ती देणार, इतक्यांत किल्ल्यावरूनच तोफांचा मारा एकदम सुरू झाला. टाव्हेरा चरकला. पहिली सलामी मराठ्यांची होती. आणि या पहिल्याच सलामींत कित्येक पोर्तुगीजांचे बळी पडले होते.

किल्ल्यावरून एकदम असा मारा होईल अशी टाव्हेराची अपेक्षा नव्हती. त्यामुळें पहिला घाव आपला पडावा आणि आपण शत्रूला घायाळ करावें ही रणनीति त्याच्या उपयोगी पडली नाहीं. कारण शत्रूच अधिक सावध होता, अधिक शिरजोर होता. टाव्हेराजवळ होती फक्त घमेंड. ती या पहिल्याच सलामींत बरीचशी उतरली !

तो क्षणभर गांगरला. त्याचें सैन्यहि कांहींसें विस्कळित झालें. पण थोड्या वेळानें त्यानें आपल्या सैन्याची पुन्हां जुळणी केली. तोफांचे मोर्चे पुन्हां नव्या जागीं नीट उभारले आणि तोफांना बत्ती देऊन किल्ल्यावर भडिमार सुरू केला.

किल्ल्यावरूनहि तितक्याच निकरानें उत्तर दिलें जात होतें. त्यांत बिलकूल कसूर होत नव्हती. किल्ल्याची तटबंदी तर अशी दणकट, त्याच्या एकाहि चिऱ्याचा एखादा टवकाहि उडाला नव्हता या वेळेपर्यंत. दोन्ही बाजूंनीं तुफान मारामारी चालू होती. किल्ल्यावरून होणारा मारा मात्र अधिक अचूक होत होता. टाव्हेराचे पाद्रीवीर पटापट मरून पडत होते. त्या मानानें किल्ल्यावरील लोकांचे प्राण अद्याप सुरक्षित होते.

इतक्यांत निसर्गहि कोपला. भयानक तुफान उठलें. सोसा-ट्याच्या वाऱ्यानें नारळीपोफळींना झोडपून काढलें. असंख्य झाडें कडाड् कडाड् करीत जमिनीवर कोसळलीं. समुद्रहि तिकडे खवळला. त्याच्या प्रचंड लाटा किल्ल्यावर जोरजोरानें धडकूं लागल्या. तरीहि किल्ला शांत होता. किल्ल्यावरील लोकहि शांत होते. गाळण उडाली ती टाव्हेराची आणि त्याच्या त्या पाद्र्यांची ! कोठून ही दुर्बुद्धि सुचली त्या टाव्हेराला आणि आम्हांला लढाईच्या या खाईंत त्यानें लोटलें कोणाला माहीत. असें झालें होतें त्यांना ! पण बोलणार कोण त्याला ? त्याची दहशत इतकी भयंकर होती कीं कोणीहि त्याच्यासमोर उभें रहाण्यास सुद्धां धजत नसे; मग विरोध करणें तर दूरच राहिलें !

थोड्या वेळानें वादळ शांत झालें. लढाईची धुमश्चक्री पुन्हां सुरू झाली. उजाडेपर्यंत लढाईचा जोर तसाच कायम होता.

उजाडल्यानंतर किल्लेदारानें शत्रूच्या सैन्याचा अंदाज घेतला व तें प्रचंड आहे हें लक्षांत येतांच त्यानें संभाजी राजांकडे तांतडीनें खबर पाठविली. इकडे लढ्याचें कामहि त्यानें अतिशय निकरानें चालू ठेविलें.

संभाजी महाराज यावेळीं चौल येथें होते. त्यांना खबर मिळ-तांच ते खूपच संतापले. पोर्तुगीजांच्या या नीच काव्याचा खरपूस समा-चार घेण्याचा त्यांनीं निर्धार केला आणि ते त्वरेनें फोंड्याकडे निघाले.


चार दिवस झाले. टाव्हेराच्या प्रचंड तोफा किल्ल्यावर अखंड आग ओकीत होत्या. परंतु तोफांच्या एकाच माऱ्यांत किल्ला लोळवि-विण्याची त्याची घमेंड आतां पुरती जिरली होती.

तटानें चार दिवस त्या माराला दाद दिली नाहीं. पण पांचव्या दिवशीं टाव्हेराच्या आशा पालवल्या. तटाच्या एका चिऱ्याला चीर गेली.

एकदां एक चीर पडलेल्या तटाला भगदाड पडावयास कितीसा वेळ लागणार ? गडकऱ्यांना कळून चुकलें, आतां खिंडार नक्की पडणार आणि फिरंगी आंत घुसणार. आतां काय करावें ?

अशा वेळीं काय करावयाचें तें मराठ्यांना सांगावें लागत नसे. चाकणचा फिरंगोजी, पावनखिंडींतील बाजी प्रभु, पुरंदरचा मुरारबाजी आणि सिंहगडचा तानाजी या साऱ्यांची कृति शाहिरांच्या डफांनीं जगजाहीर केली आहे. मराठे मरणाला भीत नसतात. त्यांच्या कोशांत भीति हा शब्द नाहीं. रणाचें कंकण हातीं बांधलेल्या वीरांना मरणाचें भय वाटत नसतें.

फोंड्यावरील रक्षक वृत्तीनें मराठेच होते. तोफांचा भडिमार करीत हजारोंनीं फिरंगी घुसला तरी ते डरणारे नव्हते. फिरंग्यांना रोखण्यासाठीं छातीचा कोट करण्याचा त्यांचा विचार केव्हांच पक्का झाला होता.



अखेर किल्ल्याला खिंडार पडलें. फिरंगी आंत घुसणार–नव्हे घुसलाहि. पण आंत घुसणाऱ्या प्रत्येक फिरंग्याला तावडतोब स्वर्ग मिळत होता. मराठ्यांच्या तलवारी आपलें काम चोखपणें करीत होत्या. सपासप मुंडकीं उडत होतीं. तडातड छात्या फुटत होत्या. भळाभळा रक्ताचे पाट वहात होते.

शेंकडों पोर्तुगीज सैनिक मारले गेले तरीहि शेंकडों आंत घुसूं पहात होते. किल्ल्यावरील लोकहि आतां मरून पडत होते. त्यांची संख्या हळूहळू घटूं लागली होती.ते तरी किती वेळ टिकणार ? शेवटीं तीं माणसेंच होतीं. आठ हजार आंत घुसत होते. फक्त तीनशें त्यांना आंतून तोंड देत होते. माणसें कशीं पुरणार ? किती वेळ पुरणार ?

किल्लेदार पराक्रमाची शर्थ करीत होता. आपल्या साथीदारांना उत्साह देत होता. महादेवाची आण घालून त्यांना तो सारखा चेतवीत होता. पण त्याची नजर मात्र किल्ल्याबाहेर कांहींतरी न्याहाळीत होती. त्याच्या मनाची विलक्षण तगमग होत होती. महाराजांना निरोप पोहोंचला नसेल का ? अजून कां ते आले नाहींत ? थोरल्या महाराजांसारखेच ते धांवून येतील का ? आमचे प्राण आतां जाण्याच्या बेतांत आहेत. ते गेले तरी चालतील. पण ही दौलत शत्रूच्या हातीं जाऊन नाहीं चालणार. ह्या दौलतीसाठीं तरी राजे येतीलच येतील.

आणि काय आश्चर्य ? पोर्तुगीजांनीं तटावर शेवटची तोफ डागली. तटाची भक्कम भिंत पार कोसळली. बाहेरच्या फिरंग्यांचा उत्साह शिगेस पोंचला. ते किल्ल्यांत घुसूं लागले.

इतक्यांत त्यांच्या पिछाडीकडून 'हर हर महादेव'ची रणगर्जना उठली. संभाजी महाराज ? होय, संभाजी राजांचेंच सैन्य होतें तें. फोंड्याच्या रक्षणासाठीं स्वतः संभाजी राजे चालून आले होते.

मग काय विचारतां ? किल्ल्यावर मूठभरच लोक होते पण राजे आल्याचें कळतांच त्यांच्यांत हजारोंचें अवसान चढलें. त्यांनींहि ' हर हर महादेव ' ची गर्जना करीत किल्ल्यांत घुसणाऱ्या फिरंग्यांची भयंकर कत्तल चालविली. पिछाडीकडून महाराजांची सेनाहि फिरंग्यांवर तुटून पडली होती.

टाव्हेरा घाबरला. खरें म्हणजे त्यानें घाबरूं नये. त्याला संभाजीला पकडावयाचें होतें ना ? संभाजी तर त्याच्या अगदीं नजीक होता. पकड म्हणावें संभाजीला आणि टाक ठार मारून ! बादशहाकडून मोठें बक्षीस मिळणार आहे ! मागें वळून तर बघ एकदां !

पण टाव्हेरा पुढेंहि जाऊं शकत नव्हता आणि मागेंहि पाहूं शकत नव्हता. चांगलाच चिमट्यांत सांपडला होता तो.

फिरंगी शिकस्त करीत होते. पण चेव आलेल्या मराठ्यांपुढें त्यांचें कांहींहीं चालत नव्हतें. पुढें घुसत होते पण फुकट मरत होते वेडे.

इतक्यांत धो धो पाऊसहि कोसळूं लागला. निसर्ग सुद्धां वस्ताद. मराठ्यांचाच साथीदार जसा कांहीं. नेमका वेळेवर धावून आला. फिरंग्यांच्या फजितीला आतां पारावारच उरला नाहीं.

त्यांच्या तोफा आतां फार मागें होत्या. टाव्हेराच्या डोक्यांत आलें कीं त्या तरी द्याव्या ठासून आणि उडवावी राजांच्या सैन्याची कत्तल. विचार फार नामी होता, फारच छान !

टाव्हेरा कसा तरी लपत छपत त्या तोफांपाशीं आलाहि. पण काय दुर्दैव त्याचें ! सगळी दारू पार भिजलेली. आतां कसल्या तोफा डागणार ! झालें-संपलें सगळें. पुन्हां आयुष्यांत फोंड्याचा विषय काढावयास नको.

आतां टाव्हेरापुढें एकच मार्ग शिल्लक होता. पळण्याचा.

तोच मार्ग त्यानें पत्करला. एकटाच एका होडींत बसून तो पळाला. तिकडे त्याचे ८८०० सैनिक मरून पडले होते. आणि हा एकटा स्वत:चे प्राण वांचविण्यासाठीं पळून जात होता. वाऽरे सेनापति !

पुढें म्हणे तो कित्येक दिवस भूमिगतच होता. कोणी म्हणतात तो एका धर्मगुरूच्या मठांत कैक दिवस लपून बसला होता ! कसेंहि असो; फिरंग्यांचा मोड झाला, त्यांच्या पदरांत नामुष्की आली एवढें खरें !

पण हें झालें फिरंग्यांच्या दृष्टीनें. मराठ्यांच्या दृष्टीनें अद्याप हें अपुरेंच होतें. टाव्हेराला पळवून लावल्यानें मराठ्यांचें कार्य संपत नव्हतें. पोर्तुगीज लोक हे हरामखोर आणि नीच होते. त्यांना या देशांत राहूं देणें अत्यंत धोक्याचें होतें.

संभाजी महाराज हें जाणत होते. त्यांना पोर्तुगीजांचा फार राग आला होता. त्यांनीं त्यांना गोव्याच्या बाहेर घालविण्याचें पक्कें ठरविलें होतें. फोंड्याची लढाई संपतांच ते त्याच उद्योगाला लागले.


फोंड्याची पडलेली भिंत तावडतोब बांधून काढण्यांत आली. सैन्याची नीट जमवाजमव करण्यांत आली आणि एके दिवशीं संभाजी राजे गोव्याकडे निघाले.

गोव्यांत ही बातमी केव्हांच येऊन थडकली. आणि केवढा हाहाःकार उडाला! आधींच घरोघर रडारड चालू होती. प्रत्येक घरांतील कर्ता पुरुष फोंड्याच्या लढाईत मारला गेला होता. तें दुःख अजून ताजेंच होतें. त्यांत आतां ह्या दुष्ट बातमीची भर पडली. आतां काय करावयाचें? कोणाचे पाय धरावयाचे? कोणाची करुणा भाकावयाची? 'साधु' झेवियरशिवाय दुसरा कोण त्राता उरला होता त्यांना?

गव्हर्नरनें केव्हांच दडी मारली होती. रक्षणापुरतें सैन्य तर नव्हतेंच गोव्यांत. पण पुरेसे पुरुषहि नव्हते तेथें. गोव्यांत होतीं तीं सर्व पोर्तुगीज माणसें साधु झेवियरच्या मंदिरांत जमा झालीं. साधु झेवियरची शव-पेटी उघडून ठेवण्यांत आली आणि सर्वांनीं प्रार्थना सुरू केली.

राजांनीं उत्तरेकडचा बारदेश जिंकला. कुंभारजुवें आणि सेन्ट इस्टोव् हीं गोव्यांचीं दोन नाकींच. तीं संभाजी राजांनी जिंकलीं. आतां ते गोव्यांत प्रवेश करणार—

इतक्यांत मोंगलांचें सैन्य कोंकणांत उतरत असल्याची बातमी आली. आणि राजांना परत फिरणें भाग पडलें—केवळ नाइलाजानें! पोर्तुगीजांना हायसें वाटलें. ते वांचले पण त्यांच्या पराक्रमानें नव्हे, केवळ नशिबानें!!





# २. पागोटें खालीं उतरलें !

संभाजी महाराजांना सतत दोन तरी आघाड्या सांभाळाव्या लागत होत्या. जंजिऱ्याच्या सिद्दीनें डोकें वर काढलें म्हणून त्याच्या समाचाराला जावें तर तिकडे दुसऱ्या टोंकाला गोव्याचा फिरंगी दंड थोपटून आखाड्यांत उतरलेला, त्याला गोव्यांत चेपावें न चेपावें तोंच मोंगलफौजा कोंकणांत उतरूं लागलेल्या. दोन्ही आघाड्यांवर एकाच वेळीं लढत रहाणें अशक्यहि असतें आणि तसें करणें शहाण-पणाचेंहि नसतें. शिवाजी महाराजांनीं सुद्धां दोन आघाड्यांवर एकाच वेळीं कधीं लढाई केली नाहीं.

संभाजी राजांच्या वेळची परिस्थिति तर अधिकच धोक्याची झालेली होती. कारण स्वतः औरंगजेबच तीन लाख फौज घेऊन महाराष्ट्राच्या उरावर येऊन बसला होता, आणि मराठ्यांच्या शत्रूंना चिथावणी देण्याचीं कारस्थानें तो करीत होता. मराठ्यांचें स्वराज्य पाळांमुळांसकट उखडून टाकण्याचा त्यानें निश्चयच केला होता.

संभाजी राजांची तडफ सुद्धां मुळींच कमी नव्हती. त्यांनीं औरंगजेबानें उठविलेल्या बहुतेक शत्रूंना नामोहरम केलें. आणि आतां

प्रत्यक्ष बादशहाशीं सामना देण्यास ते तितक्याच तडफेनें तयार झाले संभाजी राजांना गादीवर आल्यापासून उसंत अशी फार थोडी मिळाली. त्यांचें जीवन धांवपळीचेंच होतें. परंतु त्या धांवपळीच्या काळांतहि त्यांनीं गाजविलेले एक एक महापराक्रम खचितच बिनतोड मानावे लागतील.

हसनअली नांवाचा एक मातबर सरदार औरंगजेबाच्या नोकरींत होता. बादशाही सरदार म्हटले कीं ते सारे शूर, लढवय्ये आणि रणबहाद्दर समजले जात. कारण त्यांनीं बऱ्याच लढायांत भाग घेतलेला असे. आणि तें स्वाभाविकच होतें. बादशाही साम्राज्याचा विस्तारच एवढा प्रचंड कीं त्यांत लढाया सारख्याच चालणार कोठें ना कोठें तरी. म्हणून तर मोठमोठ्या सरदारांचा भला मोठा ताफा बादशहाला जवळ बाळगावा लागे.

हसनअलीनें बऱ्याच लढायांत भाग घेतला असेल हे आपण खरें मानूंया. पण त्यानें त्यांपैकीं किती जिंकल्या हें कांहीं कोठें लिहि-लेलें नाहीं. तरीपण रजपुतांच्या विरुद्ध झालेल्या लढायांत भाग घेऊन त्यानें बराच नांवलौकिक मिळविला होता असें म्हणतात. बादशहाचा म्हणे त्याच्यावर फार विश्वास होता. मराठ्यांचा नायनाट याच्याच हातुन होईल असें बादशहाला वाटलें आणि त्या कामावर त्याची नेमणूक झाली. त्याच्या हाताखालीं १४००० उत्तम फौजहि देण्यांत आली.

हसनअली औरंगाबादेहून बादशहाचा आशीर्वाद घेऊन निघाला. संभाजी राजे त्यावेळीं गोव्याच्या फिरंग्याचें पारिपत्य करण्यांत गुंतले होते. ही संधि साधून हसनअली जुन्नरच्या नाणेघाटांतून उत्तर कोंकणांत उतरूं लागला. पण राजे कांहीं सगळें मराठी सैन्य बरोबर घेऊन गेले नव्हते. त्यांचा मुख्य सेनापति हंबीरराव मोहिते स्वराज्यांत चौफेर दौडत होता. शत्रूच्या हालचालीवर त्याचें बारीक लक्ष होतें.

हसनअली नाणेघाटांतून उतरतो आहे हें त्याला समजलें मात्र ! त्यानें आपलें एक हुषार टोळकें दिलें त्याच्या मागें लावून. शेंदीडशें वीरांचें तें टोळकें कोठून कसें गेलें तें कुणाला माहीत नाहीं. पण तें

नेमकें नाणेघाटाच्या डोंगरांत शिरलें एवढें खरें. हसनअलीचा सारा फौजफांटा नाणेघाटांतून खालीं उतरूं लागल्याबरोबर या टोळक्याच्या धुरापती सुरू झाल्या. नाना प्रकारचे खेळ करून त्यांनीं अलीच्या फौजेला अति सतावलें.



कधीं आघाडीच्या सैनिकांवर छापा घालून त्यांना त्रास द्यावा. तर कधीं पिछाडीला रेंगाळणाऱ्या शिबंदीवर हल्ला चढवावा. घाटमार्गाच्या बाजूला असलेल्या दाट झाडींत लपून बसावें आणि मोंगल सैन्य जाऊं लागलें कीं मोठमोठे दगडधोंडे, गोटे आणि बाण मारून त्याला हैराण करावें. अशा अनेक चाळ्यांनीं त्यांनीं हसनअलीच्या सैनिकांना चांगलेंच सतावून सोडलें.

शेवटीं कसेंबसें हें सैन्य एकदांचें कल्याणला पोहोंचलें. तेथें त्यांना मराठ्यांचा कांहींच प्रतिकार झाला नाहीं. हसनअलीला वाटलें मराठे भ्याले. आपली एवढी प्रचंड फौज पाहून त्यांनीं येथून पळ काढला. पण घडलें होतें निराळेंच. मराठे कल्याणचा प्रदेश सोडून गेले होते हें खरें; पण ते मोंगलांना भिऊन खास नव्हे. तसें असतें तर हसनअली विजयी वीर म्हणून औरंगाबादेला गेला असता आणि तेथें बादशहाकडून त्याला मानाचे मोठे किताब मिळाले असते.

पण मग खरें काय घडलें ? खरें घडलें तें असें. हंबीरराव मोहित्याचें सैन्य कल्याणच्या आसमंतांत फिरतच होतें. योग्य संधीची

तें वाट पहात होतें. हसनअलीचें सैन्य पूर्ण बेसावध आहे असें दिसतांच मराठ्यांच्या सैन्यानें त्याच्यावर एकदम हल्ला चढविला. कल्याणच्या त्या तळावर भयंकर रणकंदन माजलें. हसनअलीचे बरेच सैनिक कामास आले. मराठ्यांचेहि कांहीं पडले, पण फार थोडे. हसनअली इतका नामोहरम झाला कीं, त्यानें कल्याणहून पळ काढला आणि त्याला बादशहाच्या समोर नाक मुठींत धरून खालीं मान घालून उभें रहावें लागलें. बादशहानें त्याची कशी संभावना केली असेल हें सांगावयास नकोच !

हसनअलीच्या मागोमाग शियाबुद्दिनहि औरंगजेबाकडे नाक मुठींत धरून आला. त्यालाहि नाशिकजवळ असलेल्या रामसेजच्या लढाईंत हंबीररावाच्या मराठे सैनिकांनीं चांगला चोप दिला होता.



असे एक एक सेनापति पळ काढून आलेले पाहून बादशहा अतिशय संतापला. त्यानें आपलें पागोटें काढून जमिनीवर रागानें आपटलें. " संभाजीचा पाडाव करीपर्यंत पागोटें पुन्हां डोक्यावर घालणार नाहीं " अशी त्यानें प्रतिज्ञा केली.

उत्तर कोंकणांत मोंगल सैन्याची डाळ न शिजल्यामुळें बादशहानें आतां एक जंगी मोहीम हातीं घेतली. १६८३ च्या पावसाळ्यांत

त्यानें आपले सर्व सरदार औरंगाबादेला बोलावले. त्यांना आपली नवीन मोहीम नीट समजावून दिली. मोहिमेंत भाग घेणाऱ्या सरदारांना त्यांचीं कामें वांटून दिलीं आणि सर्वांना निघण्याचे हुकूम दिले.

बादशहाचा वडील मुलगा शहाआलम हा या मोहिमेचा मुख्य अधिकारी. त्याच्या स्वारीची सर्व तयारी बादशहानें स्वतः लक्ष घालून करून दिली होती. प्रचंड तोफखाना, भरपूर दारुगोळा, उत्तमोत्तम शिबंदी आणि अफाट सेना घेऊन युवराज शहाआलम मोहिमेवर निघाला.

संभाजीला कोंकणांतच घेरून पकडावयाचें असा या मोहिमेचा हेतु होता. संभाजी यावेळीं गोव्यावर चालून जाण्याच्या तयारींत होता. म्हणून शहाआलम तिकडे जाण्यासाठीं रामघाटानें निघाला. वाटेंत बेळगांवाजवळ हसनअलीखान त्यास येऊन मिळाला. रणमस्तखान आणि दाऊदखान कुरेशी हेहि पुढें त्याला सामील झाले.

अशा प्रचंड तयारीनिशीं शहाआलम रामघाटानें निघाला तो डिसेंबर महिन्यांत कोंकणांत सावंतवाडीला पोहोंचला.

शहाआलम निघाल्याच्या वार्ता संभाजीला आधींच पोहोंचल्या होत्या. रामघाटांतच त्याला अडवून धरणें संभाजीला फारसें अवघड नव्हतें. परंतु त्याने एक फारच मोठें साहस करण्याचें ठरविलें. संभाजीचा खरा कस याच त्याच्या साहसांत आढळून आला.

संभाजीनें शहाआलमला नीटपणें घाट उतरूं दिला. सावंतवाडीच्या नजीक शाही सैन्याचा तळ पडला. त्यासरशीं संभाजीनें अचानक दौडत येऊन त्यावर एवढा जोरदार मारा केला कीं, मोंगलांचे असंख्य लोक प्राणास मुकले. संभाजी तेथें फार झुंजत राहिला नाहीं. विजेच्या वेगानें चालून आला. विजेच्या लोळाप्रमाणें मोंगल सैन्यावर तुटून पडला आणि विजेच्याच चपळाईनें दूर निघूनहि गेला. संभाजीच्या या अचानक हल्ल्यानें शहाआलम आणि त्याचे सर्व पराक्रमी सरदार गांगरून गेले. काय झालें तें त्यांना कळण्याच्या आंतच संभाजी निसटूनहि गेला होता.

आतां डाव पुरता उलटला. संभाजीला घेरण्यासाठीं आलेली मोंगल फौज संभाजीनें टाकलेल्या फासांत पुरती अडकली. संभाजीनें

आपलें सैन्य सर्व घाटांतून आणि आडमार्गांतून पसरून ठेविलें. त्यामुळें मोगल सैन्याला बाहेरून येणारी सर्व कुमक बंद झाली. धान्य, दाणावैरण येणें बंद झालें. जनावरें मरूं लागलीं. माणसांची उपासमार होऊं लागली. आणि रात्रीं अपरात्रीं छापे घालणाऱ्या त्या मराठी भुतांनीं मोगल सैन्याची झोंपहि उडवून लावली. झोंप नाहीं. खाणें-पिणें नाहीं, शांतता नाहीं. कसा निभाव लागणार त्या पिशाच्चभूमींत ?

बस झाली ही मोहीम. मागें फिरावें हेंच उत्तम. असा विचार करून युवराज शहाआलम माघारीं येण्यास निघाले. परंतु शहाजाद्याची पुरती शोभा अद्याप व्हावयाची होती.

ज्या रामघाटानें तो खालीं उतरला होता त्याच रामघाटानें तो आतां वर येऊं लागला. रामघाट म्हणजे दाट जंगलाचा प्रदेश. अति भयाण आणि अवघड. तो घाट चढतां चढतां शहाजाद्याच्या नाकांत दम आला. मध्येंच मरीचा रोग आला आणि त्यांत त्याची तिसरा हिस्सा फौज खतम झाली. घोडे, हत्ती, उंट वगैरे जनावरें तर इतकीं मेलीं कीं त्यांच्या दुर्गंधीनें सगळा प्रदेश दूषित झाला. आणि त्यामुळेंहि बरींच मेलीं. उरलेल्या लोकांवर पायीं प्रवास करण्याची पाळी आली. तो तरी धडपणीं व्हावा ! छे ! ते सैतान मराठे होतेच चोरटे हल्ले करायला तयार ! त्यांनीं तर उरल्या सुरल्या सैन्याची साफ चटणी उडविली.

अशा प्रकारे बादशहाचे हे लाडके चिरंजीव मोठी नामुष्की पदरांत घेऊन आणि होतें नव्हतें तें सर्व गमावून पित्याकडे परत आले. काय बोलणार आतां ? प्रत्यक्ष शहाजाद्याची ही अशी दुर्दशा झाली तर इतरांचें काय होणार ?

संभाजीला जिंकणें सोपें नाहीं हें बादशहाला पुरतें समजलें. 'डोक्यावरून खालीं उतरलेलें पागोटें खालींच राहणार काय ?' बादशहाच्या मनांत अशी शङ्का आलीच असेल !

✦ ✦ ✦

वा. क्र. ९८०.६ दि. २५.१.६६
विषय



## खासें नाक कापलें !

सोळाशें एकोणनव्वद साल ! महाराष्ट्राच्या इतिहासांतलें एक काळें पान ! थोरल्या महाराजांचा लाडका शंभू बाळ, महाराष्ट्राचा लाडका शंभूराजा औरंगजेबानें ठार केला ! तुळापूरजवळच्या वढूच्या रानांत संभाजी राजांना हाल हाल करून ठार मारण्यांत आलें.

संभाजी महाराजांच्या मरणानें अवघा महाराष्ट्र पेटला. सूड ! सूड ! आमच्या राजाला इतकें भयंकर मरण ज्यानें दिलें, त्या औरंगजेबाचा पुरता सूड घ्यायचा. ह्या पापी औरंगजेबाला दिसू दे कीं मराठ्यांचा राजा मारलास तरी मराठे अजून जिवंत आहेत. नव्हे, त्याच्या अपमानानें त्यांचीं मनें भयंकर पेटलीं आहेत. त्यांच्या मनांत पेटलेला हा सूडाचा वणवा तुझी अवघी बादशाही भस्मसात् करील तेव्हांच शांत होईल !

संभाजी महाराजांच्या रिकाम्या तख्तावर राजाराम महाराज आरूढ झाले. आपल्या पराक्रमी भावाच्या रिकाम्या सिंहासनाची पायरी चढतांना राजाराम महाराज अडखळले. शंभूराजांच्या आठवणीनें डोळे भरून आले; त्यांचे एकट्याचेच नव्हे. तर दरबारांतल्या प्रत्येक वीराचे, मुत्सद्याचे डोळे पाणावले. भरल्या अंतःकरणानें रामचंद्रपंत अमात्य, प्रल्हाद निराजी, परशुरामपंत प्रतिनिधि, निळोजी पिंगळे, संताजी घोरपडे, धनाजी जाधव सारे दरबारांत जमले. राजाराम महाराजांच्या नेतृत्वाखालीं सुरक्षामंडळ स्थापन झालें. जिवांत जीव असेपर्यंत स्वराज्याचें रक्षण करायचें असा सर्वांनीं निर्धार केला. मराठ्यांच्या राजाचा बळी घेऊन औरंगजेबाचें समाधान झालें नव्हतें. त्यांची राजधानी आणि राजघराणेंहि बुडवून टाकण्याचा त्याचा विचार होता. मग त्यांचें स्वराज्य हातीं पडायला उशीर नव्हता. शंभुराजांच्या अपमानित मरणानें महाराष्ट्राच्या मानी मनाला केवढी तरी खोल जखम झाली होती. पण ती भरूं देण्याइतकी सवड आतां उरली नव्हती. स्वराज्यावर शेवटचा प्रहार करायला बादशहा टपला होता. त्यासाठीं त्यानें जंगी तयारी चालविली होती. त्या कर्दनकाळानें स्वराज्याचें माणिक गिळण्यासाठीं आपला विकराल जबडा उघडला होता !—

पण तें माणिक त्याच्या जबड्यात पडायचें नव्हतें. बादशहाला 'मराठ्यांचें स्वराज्य' लाभायचें नव्हतें. आणि म्हणूनच त्या स्वराज्यावर शेवटचा जोरदार प्रहार करण्यासाठीं त्यानें चालविलेले प्रयत्न वायां गेले. तो प्रहार त्याच्यावरच उलटला ! मुळांतच खिळखिळी झालेली बादशाही ह्या उलटलेल्या प्रहारानें चांगलीच हादरली. आज पंचवीस वर्षें घरदार सोडून बादशहाचे लाखों सैनिक महाराष्ट्रांत झुंजत होते. त्यांच्याच्यानें ही झुंज होत नव्हती. घरापासून, आपल्या मुलखापासून फार दिवस दूर राहिल्यानें तिकडेच त्यांचें मन ओढ घेत होतें. बादशहाच्या या दख्खनच्या मोहिमेंत त्यांना रस वाटेना. त्यांतच मराठ्यांचे गनिमी छापे त्यांच्या सैन्याचे लचके तोडीत होतेच. त्यामुळें बादशहाचा प्रचंड सेनासागर हैराण झाला होता.

स्वतः बादशहाहि मराठ्यांशीं झुंजून झुंजून थकला होता. मराठ्यांशीं वैर करण्यांत जन्म गेला, पण हातीं काय आलें ? त्यांचें स्वराज्य ? छे ! पराभव ! अपयश !

त्याचाच धक्का सहन न होऊन औरंगजेब मरण पावला. मराठेशाहीचा कर्दनकाळ बनलेला बादशहा अपयशानें कलंकित झाला ! जीवनाचा भार त्याला सहन होईना. १२५ वर्षे जगण्याची उमेद होती त्याला, पण पुरती शंभरी सुद्धां त्यानें गांठली नाहीं. मराठ्यांनीं उलटविलेल्या प्रहारानें बादशहाला शब्दशः मातीला मिळविलें !

कोणी दिला हा जबरदस्त धक्का ? ही अपूर्व करामत कुणाची ? हें विलक्षण कर्तृत्व, विलक्षण साहस कुणाचें ? कुण्या एकाचें नव्हे ! या साऱ्या करामतीची जबाबदारी कुण्या एकट्या दुकट्या वीराची नव्हती; तर संभाजी महाराजांच्या मरणानें ज्यांच्यांत वीरश्री संचारली अशा वीरांचा हा पराक्रम होता. राजांच्या क्रूर मरणानें महाराष्ट्रांतल्या पराक्रमाला संजीवन मिळालें. सूडाच्या कल्पनेनेंच मराठे वीरांचीं हत्यारें पाजळूं लागलीं. तलवारीच्या नितळ, चकाकत्या पात्यांवर औरंगजेबाचें प्रतिबिंब दिसूं लागलें. बादशाही उलथून पाडण्यासाठीं भीमथडी तट्टें चौखूर उधळूं लागलीं. संभाजीच्या मरणानें महाराष्ट्र चेतनाहीन होईल असें बादशहाला वाटलें होतें. मग तर स्वराज्य जिंकणें अगदींच सोपें होतें. त्यामुळें शंभुराजांना मारल्यानंतर स्वराज्य जिंकल्याचींच स्वप्नें बादशहाला पडूं लागलीं. पण त्या स्वप्नांमधून खडबडून जागें केलें त्याला, तें महाराष्ट्रांतल्या नव्या तेजस्वी वीरांनीं ! त्यांच्या घोड्यांच्या टापांनीं त्याचीं स्वप्नें उधळून लावलीं.

संताजी घोरपडे हा असाच एक उसळत्या रक्ताचा वीर होता. घोरपड्यांचें सारें घराणेंच रणधुरंधरांचें. शिवाजी महाराजांचें भोंसले घराण आणि घोरपडे घराणें हीं दोन्ही घराणीं म्हणजे एकाच राजपूत कुळाच्या दोन शाखा. दोन्ही घराणीं पराक्रमी, स्वतंत्र वृत्तीचीं. स्वाभिमान आणि निष्ठा त्यांच्यांत पुरेपूर बाणली होती. त्या

दोहोंतलें भोंसलें घराणें पुढें महाराष्ट्रांत आलें. शहाजी राजांसारखा पराक्रमी पुरुष महाराष्ट्राला लाभला. स्वराज्य-संस्थापनेचा विचार राजांनीं महाराष्ट्राच्या मनांत रुजविला. तो प्रत्यक्षांत आणण्याची कामगिरी शहाजी राजांच्या अलौकिक पुत्रानें, शिवछत्रपतींनीं केली. महाराष्ट्रांत रामराज्य नांदूं लागलें आणि त्याचवेळीं घोरपडे महाराजांच्या सेवेंत रुजू झाले. म्हाळोजी घोरपडे हा शिवाजी महाराजांचा एकनिष्ठ सेवक. त्याचाच मुलगा म्हणजे महापराक्रमी संताजी !

संताजीसारखेच त्याचे भाऊ मालोजी, बहिरजी हेहि पराक्रमी होते. ह्या साऱ्यांचीं घोडदळाचीं पथकें होतीं. हंबीरराव मोहित्यां-सारख्या खंद्या सेनानीच्या तालमींत हे सारेजण तयार झालेले होते. लढाई म्हणजे त्यांच्या डाव्या हातचा खेळ होता. पण या सर्वांतहि



संताजीचा पराक्रम बिनतोड होता. स्वराज्याबद्दलचा अभिमान, शिवाजी महाराजांविषयींची विलक्षण निष्ठा यांमुळें त्याच्या पराक्रमाला आगळेंच तेज आलें होतें. संभाजी राजांच्या मरणानें त्याचा पराक्रम उफाळून आला. महाराष्ट्रांत

हातपाय पसरून राहिलेल्या औरंगजेबाला कसा नि कुठें ठेचूं असें त्याला झालें होतें.

औरंगजेबाची लक्षावधि सेना महाराष्ट्रांत पसरली होती. ठिकठिकाणीं छावण्या पडल्या होत्या. औरंगजेबाच्या पदरीं असलेल्या शेंकडों नामांकित सरदारांचे भव्य शामियाने उभे राहिले होते. त्या शामियानांच्या दाराशीं धिप्पाड हत्ती झुलत होते. उंच नि रुबाबदार अरबी घोड्यांच्या रांगा लागल्या होत्या. बादशहाचें केवढें तरी वैभव त्या शामियान्यांच्या रूपानें उभें होते. त्याच्या रक्षणासाठीं ठायीं ठायीं चौक्या-पहारे बसविण्यांत आले होते. रात्रीच्या वेळीं सारा सेनासागर शांत झाला असतांना मधुनच उमटणाऱ्या पहारेकऱ्यांच्या आरोळ्या वातावरणांतली शांतता भंगून टाकीत होत्या.



औरंगजेबाचा एवढा सारा खटाटोप होता महाराष्ट्र जिंकण्यासाठीं. पण त्याला यश येत नव्हतें. झुल्फिकारखान, लुत्फुल्लाखान यासारखे त्याचे नामांकित सैनिक संताजीच्या छुप्या हल्ल्यांनीं नामोहरम झाले होते. काफरांचें राज्य बुडविण्यासाठीं आले होते ते, पण पराभवाच्या गर्तेत सारखे बुचकळून निघत होते बिचारे ! 'संभाजी हातीं आल्यानें त्यांना पुन्हां एकदां जोर चढला. मराठ्यांचा राजा मारला ! आतां फक्त राजधानी ताब्यांत घ्यायची कीं काम फत्ते झालें !' अशी त्यांची साऱ्यांची कल्पना होती !

मोंगली गिधाडांच्या अशुभ घिरट्यांनीं रायगडावरील वातावरण भयचकित झालें होतें. अशांतच रायगड जिंकण्यासाठीं इतिकतखानासारखा बलाढ्य सेनापति भलें मोठें सैन्य घेऊन निघाल्याची बातमी रायगडावर येऊन थडकली.

आणि रायगडावर एकच धांदल उडाली. राजाराम महाराज, रामचंद्रपंत अमात्य यांसारखे महाराष्ट्राचे आधारस्तंभ रायगड सोडून निघाले. महाराणी येसूबाईंच्या आग्रहामुळें गड सोडून निघाले. पण जातांना त्यांनीं गडाच्या रक्षणाची चोख व्यवस्था ठेवली होती गडावर अन्नधान्य, शस्त्रसामुग्री भरपूर होती. गडहि उंच नि बळकट. कितीहि बलाढ्य शत्रू असला तरी त्याला सहजासहजीं दाद न देणारा होता. गडावरचीं खाशीं माणसें येसूबाईसाहेब आणि शाहू राजांच्या रक्षणासाठीं सज्ज होतीं.

राजाराम महाराज जिंजीच्या दिशेनें निघून गेले. त्यांना रामचंद्रपंतांनीं महाराष्ट्राचा सांभाळ करण्याचें वचन दिलें होतें. त्यासाठीं त्यांनीं दोन खंद्या वीरांवर ही रक्षणाची कामगिरी सोंपविली. ते वीर म्हणजे संताजी घोरपडे आणि धनाजी जाधव ! रायगडावर कोसळूं पाहणाऱ्या बादशाही सेनेला वाटेंतच हैराण करण्याचा मनसुबा ह्या जोडगोळीनें रचला होता. इतिकतखान तुळापुराहून निघाल्याची बातमी संताजीला लागली आणि संताजी त्याला वाटेंतच गांठण्यासाठीं निघाला. शिंगणापूरजवळच्या शंभुमहादेवाच्या डोंगरावर त्यानें तळ दिला. पण तिथें आल्यावर त्याला कळलें, खान आधींच रायगडाकडे निघून गेला ! संताजीची निराशा झाली. कांहीं काळ त्याचें मस्तक सुन्न झालें. पण त्यानें नवीनच साहसी बेत आंखला आणि तो पार पाडण्यासाठीं तो महादेवाच्या डोंगरावरून निघालाहि. विश्रांति हा शब्दच त्याच्या कोशांत नव्हता. बरोबर दोन हजार निवडक वीर घेतले आणि तो जेजुरीला येऊन थडकला.

जेजुरीचा खंडोबा महाराष्ट्राचे जागतें दैवत. भोळ्याभाबड्या मावळ्यांची श्रद्धा खंडोबाच्या चरणीं वाहिलेली. कोणत्याहि शुभकार्याच्या आरंभीं जेजुरीच्या खंडोबाला आवंतण द्यायला हे भोळे

जीव कधीं विसरले नाहींत. त्या खंडोबाचा आशीर्वाद घेण्यासाठीं संताजी जेजुरीला आला. नवलाख पायऱ्या चढून त्यानें खंडोबाचें दर्शन घेतलें. आणि तिथून निघाला तो थेट दिव्याच्या घाटांत येऊन दबा धरून बसला.

तुळापुरास खुद्द औरंगजेब बादशहाची छावणी पडली होती. भव्य शामियान्याच्या रूपानें शाही वैभवाचें प्रदर्शन मांडलें गेलें होतें. बादशहाच्या शामियान्याला तर सोन्याचे कळस होते ! दिल्लीपतीची ती प्रचंड छावणी तुळापूराच्या आसपासचा सहा मैलांचा टापू व्यापून राहिली होती. सुस्तावलेला अजगरच जसा कांहीं पहुडला आहे, असें तिच्याकडे पाहणाराला वाटत होतें. बादशहाच्या शामियान्याच्या भोंवतालींच बड्या बड्या सेनापतींचे तंबू होते. भल्यामोठ्या कासवांच्या आकाराचे. त्या सेनापतींचीं अंतःकरणें कासवांच्या पाठीसारखींच कठीण होतीं. संभाजीच्या क्रूर वधानें कोण आनंद झाला होता त्यांना ! म्हणूनच ऐषारामांत दिवस घालवीत होते ते. 'बादशहा नवे नवे बेत करतोय्, करूं दे. स्वारीवर जायचा हुकूम नाहीं तोंपर्यंत आरामांत रहायला काय हरकत आहे ?'



संताजीला मात्र क्षणाची फुरसत नव्हती. स्वराज्याला स्वास्थ्य लाभत नाहीं, तोंपर्यंत स्वराज्याच्या सेवकांना तरी तें कसें लाभेल ? संताजीच्या डोक्यांत विचारचक्रें जोरानें फिरत होतीं. एक विलक्षण

विचार त्याला सुचला. तुळापुरांत पसरलेल्या शाही छावणीवर हल्ला करायचा आणि बादशहाला ठार मारायचें! मराठेशाहीभोंवतीं विळखा घालून बसलेला तो जहरी नाग ठेंचून काढायचा! आपल्या विषारी दांतांनीं मराठेशाहीला अखेरचा कडकडून चावा घेण्यासाठीं टपलेल्या नागावर त्याच्या वारुळांत शिरून हल्ला करायचा! केवढा साहसी विचार हा! पण संताजीनें अत्यंत निडरपणानें हा विचार अंमलांत आणायचें ठरविलें होतें. एकदां बेत ठरला म्हणजे ठरला! मग तो कितीहि धाडसी बेत असो, पार पाडायचाच, हें संताजीचें ब्रीद होतें. त्यामुळें बादशहाच्या तीन लाख सैनिकांच्या तळांत शिरून शाही शामियान्यावर हल्ला करण्याचा त्याचा विचार जरासुद्धां फिरला नाहीं.

कोणत्या बळावर संताजी हें साहस करायला निघाला होता? त्याच्याजवळ बादशहाइतकें लाखांवर सैन्य होतें? कीं त्याच्याजवळ अल्लाउदिनाचा जादूचा दिवा होता? घासला दिवा कीं आलें राक्षसाचें सैन्य शत्रूशीं लढाई करायला! संताजीजवळ फक्त दोन हजाराचें एक पथक होतें आणि बादशहाच्या छावणींत तीन लाखांची सेना होती! ह्या प्रचंड छावणींत हें छोटेंसें पथक लढाई करायला जाणार होतें! केवढें धाडस हें!

नेहमींच्या पद्धतीप्रमाणें संताजीनें आपल्या सैनिकांच्या निरनिराळ्या टोळ्या केल्या. प्रत्येक टोळीच्या म्होरक्याला कोणीं कोणत्या मार्गानें प्रवेश करायचा तें सांगितलें.

"हें पहा बहिरजी, तुझ्या टोळीला घेऊन तूं छावणीच्या मागच्या बाजूनें प्रवेश करायचा. आणि गोमाजी, तूं मधल्या अंगानें छावणींत घुसायचें.

"आंत शिरतांना आपण जसे कांहीं मुघल सैनिकच आहोंत अशा थाटांत जायचें. कुणी पहारेकऱ्यानें अडवलें तर 'आम्ही गणोजी शिर्क्यांचे लोक' म्हणून बिनदिक्कत सांगायचें.

"आणि हें पहा, काम फत्ते झालें, तर खुणेचा इशारा पटतांच छावणींतून पळायचें नि थेट जंगलांत घुसायचें.

" चला ! चला !! आतां निघायचेंच. भवानी आई आपल्या पाठीशीं आहे. शिखरावरच्या महादेवानें कौल दिलाय्—थोरले महाराज आपलें हें साहस आभाळांतून कौतुकानें पहात असतील. चला रे गड्यांनो, आज आपल्याला जिवाच्या करारावर ही मर्दुमकी केली पाहिजे." असें आपल्या सर्व टोळ्यांना परोपरीनें सांगून, त्यांना उत्तेजन देऊन संताजी आपलें पथक घेऊन निघाला.

ऐन मध्यरात्रीचा सुमार. डोळ्यांत बोट घातलें तरी समोरचें दिसायचें नाहीं इतका दाट काळोख पसरला होता. जसा कांहीं काजळाचा समुद्रच. झाडीसुद्धां तितकीच दाट नि भयाण होती. मधूनच एखादा पक्षी घाबरून किंचाळत उठे आणि त्याच्या आवाजानें सारें वातावरण घुसळून निघे. मधुनच एखादा लांडगा मावळ्यांच्या पुढून सर्रकन् निघून जाई. पण त्यांना कोल्ह्यालांडग्यांकडे लक्ष द्यायला फुरसत कुठें होती ? ते आपले आपल्याच नादांत चालले होते. डोईवर लाल मुंडाशीं, खांद्यावरून काळ्या घोंगड्या पांघरलेल्या. त्यामुळें रानांतून कोण चाललें आहे हें ओळखणेंच कठीण होतें.

छावणी जवळ येत चालली. ठायीं ठायीं उभारलेल्या चौक्या-पहाऱ्यांवर गस्तवाले गस्त घालीत असलेले दिसूं लागले. संताजीचें पथक तरीसुद्धां निर्भयमनानें वाट कापीत होतें. त्याला दबकत, लपत छपत जाण्याचें काय कारण होतें ? तें मोंगलांचेंच एक पथक बनलें होतें ना ?

बादशहाची छावणी आतां जवळ आली. म्हणजे तशी ती अजून दीड-एक कोस लांबच होती. पण दीड कोस म्हणजे एका रात्रींत मैलच्या मैल जंगल तुडवणाऱ्या मावळ्यांना भारी नव्हेत. सगळे मावळे भराभर चालले होते. चालतां चालतां मजेंत बोलत, हंसत होते. इतक्यांत बादशहाच्या एका फिरत्या गस्तवाल्यानें त्यांना हटकलें, " ठहरो ! कौन हो तुम ? किधर चले हो ? "

" क्यों जी, आप हमें पहचानते नहीं ? "

" इसीलिये तो पूछनेकी जरूरत पडी ! "

"हम तो आप जैसेही मुघल सिपाही हैं। राजा गणोजी शिर्कोंकी सेवामें पेश हो गये हैं। छविनाके कारण निकल गये थे बाहर। कुछ देर हुई। अभी वापस आये हैं।"

"अच्छा, तो फिर जाओ।"

चला, सुटका झाली! संताजीच्या अकलहुषारीनें पहारेकऱ्यांना जरासुद्धां संशय आला नाहीं. आतां बादशहाची छावणी अगदीं समोर दिसूं लागली. तिच्या भोंवतालीं नक्षीदार झालरीच्या बत्त्या पेटलेल्या होत्या. नंग्या समशेरी हातांत घेतलेले उंच, धिप्पाड पहारेकरी सारखे इकडून तिकडे फिरत होते. त्या बत्त्यांच्या प्रकाशांत भोंवतालचे बड्या सरदारांचे शोभिवंत शामियाने दिसत होते. पण संताजीच्या नजरेला त्या उजेडांत काय दिसलें असेल, तर फक्त बादशहाचा भव्य शामियाना आणि त्यावरचे सोन्याचे कळस! त्याच्या मनांत विचार चालला होता–'बादशहाचा दिमाख उतरवण्यासाठीं त्याच्या तंबूचे हे सोन्याचे कळस कापून ......'

"ठहरो!" एका पहारेकऱ्यानें अडविलें. त्यानें बत्त्यांच्या उजेडांत मावळ्यांचे सारे चेहरे निरखले. त्या चेहऱ्यांवर त्याला स्वतंत्र बाणा दिसला, स्वराज्यनिष्ठा दिसली. पराक्रमाचें पाणी त्याला मावळयांच्या डोळ्यांत दिसलें. त्यांच्या चालींतला विलक्षण चपळपणा त्याला जाणवला. त्याला संशय आला आणि त्यानें त्यांना हटकलें. संताजीनें पुन्हां तींच उत्तरें दिलीं. शेवटीं तो पहारेकरी म्हणाला, "अच्छा, तो फिर परवल बताओ!"

"हाँ हाँ! जरूर बताते हैं।" असें म्हणून संताजी त्या पहारेकऱ्याच्या अगदीं जवळ गेला; आणि डोळ्याचें पातें लवतें न लवतें तोंच त्यानें त्याला खतम् केलें!

सारी छावणी शांत होती. सैनिक घोरत पडले होते. मध्यरात्र उलटून गेल्यामुळें पहाराहि थोडा ढिला पडला. पहारेकऱ्यांचे डोळे पेंगूं लागले. त्यांच्यावर झोंपेचा अंमल चढूं लागला. इतक्यांत एकाएकीं 'हर हर महादेव' अशी गगनभेदी गर्जना कानावर पडल्यानें ते पहारेकरी

दचकले. भांबावल्या नजरेनें आजूबाजूला पाहूं लागले. तों शेंपन्नास समशेरी उपसल्या गेलेल्या दिसल्या. जो समोर दिसेल त्याला त्या कंठस्नान घालूं लागल्या. मराठ्यांच्या तलवारींना बळी पडलेल्यांच्या मरणकाळच्या किंकाळ्यांनीं छावणी घुमूं लागली. स्वप्नामध्यें गुंग असलेल्या मोंगल सरदारांना जाग येऊं लागली.



" अरे, काय झालंय् तरी काय ? "
" कोण आले ? मराठे ? "
" छे ! अशक्य ! "
" खरंच मराठे आले ! "
" कसे येतील ? "
" कसे येतील ? पण ते आले ना. उठा, तलवारी उचला. "

मोंगलांच्या तंबूतंबूंतून एकच हलकल्लोळ माजला. अर्धवट उजेडांत कुणी कुणाला दिसेना. झोंपेतून पुरता सावधपणा येईना. अर्धवट गुंगीच्या अवस्थेंत मोंगल सैनिक तंबूच्या बाहर आले. कांहीं

तंबूंतच झोंपेंतच होते. कोण कुठले मराठे ? असतील शेंपन्नास. कशाला उठायचं ? त्यापेक्षां झोंपच बरी, असा विचार करून कित्येक मोंगल तसेच झोंपून राहिले. आणि ती त्यांची काळझोंपच ठरली. संताजीच्या मावळ्यांनीं झोंपलेल्या कित्येक मोंगलांना कापून काढलें. असे अगणित मोंगल सैनिक मेले. कित्येक जण भीतीनेंच अर्धमेले झाले. 'मराठे' हा शब्द ऐकतांच कित्येकांची शुद्ध गेली.

हा असा कल्लोळ चाललेला असतांनाच संताजी खुद्द बादशहाच्या तंबूकडे धांवला. बरोबर त्याचे दोघे भाऊ आणि विठोजी चव्हाण होता. चौघांच्या मुद्रा उजळलेल्या होत्या. त्या मुद्रांवर मराठ्यांच्या शौर्याचा संपूर्ण इतिहास लिहिलेला होता. संभाजी राजांच्या मृत्यूचा सूड त्यांच्या डोळ्यांत जळत होता. औरंगजेब नुसता त्यांना दिसला असता तरी उभा जळून गेला असता, अशी आग त्या चौघांच्या डोळ्यांतून बरसत होती. बादशहाच्या तंबूवर चौघेहि एकदम तुटून पडले. त्या तंबूंचे तणावे त्यांनीं भराभर कापून टाकले. त्याबरोबर तो भव्य शामियाना भुईसपाट झाला. सपाट्यांत संताजीनें त्या तंबूचे सोन्याचे कळस कापून घेतले. आणि आपल्या पथकाला खुणेचा इशारा दिला.

आतां मागें वळून पहायला त्याला सवडच नव्हती. आपल्या पथकांतल्या लोकांसह तो सुसाट धांवूं लागला. धांवतां धांवतां त्याच्या मनांत विचार येऊं लागले. 'बादशहा त्या तंबूंत गुदमरून मेला असेल बहुधा. अर्थात् तो त्या तंबूंत असला तर...तर नक्कीच गुदमरून गेला असेल. आमचा राजा मारला ह्या दुष्टानं ! भोंवतालचं मोंगल सैन्य जागं झालं नसतं, तर त्या दुष्टाच्या तंबूंत शिरून त्याला अस्सल मराठ्याच्या तलवारीचं पाणी दाखवलं असतं. ह्या–ह्या तलवारीनं त्याचं शिर धडावेगळं केलं असतं. मोंगलांना दाखवून दिलं असतं कीं सूडाची आग ही शत्रूची आहुति पडल्यावरच शांत होते ! पण अरेरे, खुद्द औरंगजेब हातीं लागला नाहीं. तो त्या तंबूंत गुदमरून मेला असेल ना ?' असे एक ना दोन अनेक विचार

त्याच्या मस्तकांत घोळत होते. मोंगलांच्या सगळ्या चौक्या-पहारे पार करून संताजीचे सर्व लोक पुन्हां रानांत एकत्र जमले.

मराठे पसार झाले मात्र, इकडे मोंगलांच्या छावणींत एकच धांवपळ सुरू झाली. आतां मात्र मोंगल सरदार खडबडून उठले होते. त्यांची झोंप पार उडाली होती—अर्थात् जे जिवंत होते त्यांची! मोंगलांचे बडे बडे सेनापति प्रश्नांकित चेहरे करून बादशहाच्या तंबूपाशीं जमा झाले.

मराठ्यांनीं अशा अपरात्रीं हल्ला केला आणि आपल्या बादशहाच्या तंबूचे कळस कापून नेले! केवढें हें धाडस! छे, छे त्या धाडसाचा विचार करायला आतां वेळ नाहीं. तें करणाऱ्या मराठ्यांना आधीं गिरफदार केलें पाहिजे. झालें. सर्व सेनापति आपापल्या पथकांना सज्ज होण्याचे इशारे देऊं लागले. आणि हल्ला करणाऱ्या मराठ्यांना पकडण्याचे हुकूम जोरजोरांत करूं लागले. ते महाभयंकर मराठे समोर दिसत नव्हते. त्यामुळें त्या सेनापतींना जरा जास्तच आवेश चढला. त्यांच्या बोलण्यांतून विलक्षण चीड व्यक्त होऊं लागली. अरे! पण ही चीड कुणाबद्दलची? आणि ती आपल्याच सैनिकांवर काय म्हणून काढायची? आणि आतां चिडून तरी काय उपयोग होता? मुलखाचे चपळ मराठे, ते थोडेच हातीं येणार होते?

तोबा, तोबा! हें असें झालें तरी कसें? छावणींत सकाळपर्यंत गोंधळ चालला होता. भीतीची दाट छाया भोंवतालच्या वातावरणावर पडली होती. शहेनशाह जागे होतील, तेव्हां काय म्हणतील ते? आपणां सर्वांचा धिक्कार करतील. भयंकर संतापतील. एवढ्या कडक पहाऱ्यांतून हे मराठे आलेच कसे? अगदीं थोड्या काळांत त्यांनीं एवढे मोंगल मारले! रक्तानें रंगलेली [illegible]तली जमीन पाहून शहेनशहाचे डोळे लालेलाल होतील. पण काय करा[illegible] मराठे हातीं सांपडलेच नाहींत त्याला काय करणार? काय उत्तर देणार बादशहांना? सर्व मोंगल सेनापतींच्या मनांत एकच एक घटना घोळत होती. पण ती घडली कशी याचा पत्ता मात्र कुणालाच

लागला नाहीं. स्वतःविषयींच त्यांच्या मनांत चीड उत्पन्न झाली. पण संतापानें हात चोळीत बसण्यापलीकडे काय उपाय होता? बादशहाच्या तंबूकडे नजर जातांच कालपर्यंत त्यावर चमकणारे सोन्याचे कळस त्यांच्या डोळ्यांपुढें दिसत होते. ते कळस कापून नेऊन संताजीनें मोंगलांचें नाकच कापलें होतें !



इकडे सिंहगडाखालच्या रानांत संताजीचे सारे लोक एकत्र आले. काम फत्ते झाले होतें. विजयाचा आनंद सर्वांच्या मुखांवरून ओसंडत होता. बहादुरी गाजवणाऱ्या आपल्या साऱ्या सवंगड्यांची संताजी पाठ थोपटत होता. पण राहून राहून त्याच्या मनांत येत होतें—'बादशहा मेला असेल ना? हो, नक्कीच मेला असेल. पण छे! तो कसला मरतो? दीर्घायुषी आहे तो. १२५ वर्षे जगणार आहे म्हणे!'

आणि खरेंच—बादशहा त्या रात्रीं स्वतःच्या तंबूंत नव्हताच. तो त्या रात्रीं आपल्या मुलीच्या तंबूंत होता. केवढा योगायोग हा! संताजीच्या हातून बादशहाला मरण यायचें नव्हतें. मराठ्यांकडून होणारे कितीतरी आघात अजून सोसायचे होते त्याला. आपण अजूनहि तरुणच आहोंत, तरुणाच्याच जोमानें आपण युद्ध करूं शकतों, असें बादशहाला अजूनाहि वाटत होतें. तो मराठ्यांना नामोहरन करण्यासाठीं हरतऱ्हेनें प्रयत्न करीत होता. पण घडत होतें उलटेंच. त्यांतल्या त्यांत सुदैवाची गोष्ट अशी कीं, संताजीच्या ह्या हल्ल्यांत तो मेला नाहीं. मराठ्यांचे पुढचे सारे प्रहार अंगावर घ्यायला तो जिवंत राहिला! म्हणूनच मराठे जिवंत आहेत, हे संताजीच्या पराक्रमानें त्याला दिसून आलें. संताजीला तेवढेंच समाधान मिळालें.

ही कामगिरी आटोपून संताजीचे सर्व स्वार सिंहगडाच्या जंगलांत जमले होते. सिंहगडावर प्रतापराव गुजराचा मुलगा सिदोजी हा किल्लेदार होता. त्यानें ह्या मंडळींचें मोठ्या प्रेमानें स्वागत केलें. बादशहाला चांगला धडा देऊन ही मंडळी परत आली होती. यश घेऊन आली होती. त्यांचें किती स्वागत करूं, असें सिदोजीला होऊन गेलें. दोन दिवस सिदोजीकडे संताजीनें आणि त्याच्या पथकानें चांगला पाहुणचार झोडला.

आणि तिसऱ्या दिवशीं संताजी गडाबाहेर पडला. पाठोपाठ त्याचे मावळे वीर होतेच. सिदोजीकडच्या दोन दिवसांच्या पाहुण-चारानें चांगलेच ताजेतवाने झाले होते सारे. आतां नवीन कामगिरी हातीं घ्यायची. पुन्हां नवे बेत होऊं लागले. संताजीला वेगवेगळे बेत सुचविले गेले. अखेर सर्वांनीं भोरच्या दिशेनें मोर्चा वळविला. भोरवरून वरंधा घाटानें ते निघाले. त्यांनीं थेट रायगडची वाट धरली.

✦ ✦ ✦

रायगडाभोंवतीं इतिकतखानानें तांत आवळली होती. आपल्या भल्यामोठ्या सेनेचे विळख्यावर विळखे देऊन इतिकतखान रायगडा-खालीं राहिला होता. गडावर मराठ्यांची लाडकी महाराणी येसूबाई आणि मराठेशाहीचा भावी वारसदार—छोटे शाहूराजे अडकले होते. इतिकतखान वाट पहात होता—केव्हां एकदां रायगड हातीं येतो आणि मराठ्यांच्या महाराणीला आणि भावी राजाला केव्हां एकदां आपण कैद करतों !

ह्याच इतिकतखानाचा रायगडला वेढा पडण्यापूर्वी राय-गडच्या वाटेंतच त्याला अडवायचा संताजीचा बेत होता. तो बेत सिद्धीस गेला नव्हता. म्हणून मध्येंच त्यानें तुळापूरच्या छावणीवर हल्ला करून थेट बादशहाच्या तंबूपर्यंत मजल मारली. यश पदरीं बांधूनच तो तिथून परतला होता. आतां ह्या इतिकतखानाला चांगला धडा द्यायचें त्यानें ठरविलें.

रायगडाच्या भोंवतालच्या परिसरांत खानाच्या लाखों सैनिकांचा तळ पडला होता. मोठमोठे तंबू उभारले होते. उंट-घोड्यांच्या रांगा लागल्या होत्या. हत्ती झुलत होते. कुठें कशाची कमतरता नव्हती. तरीहि रायगड खानाच्या हातीं येत नव्हता.

एक दिवस अचानकपणें वेढ्याबाहेरून मराठ्यांचा हल्ला झाला. खांनाचे सैनिक गडबडले, भयभीत झाले. वेढ्यांत एकच गोंधळ झाला. मराठे कुठून, कसे आले, हें त्यांना समजण्यापूर्वींच त्यांचे पांच हत्ती आणि हातीं लागली ती संपत्ति घेऊन मराठे केव्हांच पसार झाले होते !



संताजीच्या ह्या दोन छुप्या हल्ल्यांमुळें मराठ्यांची मोंगलांना विलक्षण दहशत बसली. मोंगलांचे मोठमोठे सरदार मनांतल्या मनांत मराठ्यांना वचकून राहूं लागले. 'हीं मराठी भुतें केव्हां कुठून येतील आणि आपल्याला मारून जातील याचा नेमच राहिला नाहीं !'

तेव्हांपासून संताजीची विलक्षण भीति घेतली मोंगलांनीं. असें म्हणतात कीं, मोंगल सरदारांचे घोडे पाणी पीतनासे झाले तर ते त्यांना विचारीत, "का रे बाबांनो, तुम्हांला पाण्यांत संताजी दिसतो काय ?"

संताजीच्या ह्या पराक्रमांना तोड नाहीं. मराठ्यांना जिंकणें किती अवघड आहे हें त्यानें बादशहाला दाखवून दिलें. खुद्द बादशहाच्या तंबूचे सोन्याचे कळस कापण्याचें त्याचें धाडस अलौकिक होतें. त्यायोगें संताजीनें खरोखरच स्वराज्यावर सदा नाक फेंदारणाऱ्या बादशहाचें खासें नाकच कापलें !





# शेवटचा प्रहार

किल्ले म्हणजे मराठी राज्याचे केवळ प्राण होते. छत्रपति शिवाजी महाराजांची सारी भिस्त त्यांच्या गड, कोट· आणि किल्ले यांवरच असे. मराठ्यांचें सारें जीवनच मुळीं डोंगरपहाडांवर अवलंबून होतें. डोंगराळ मुलुखांत ते रहात होते. दऱ्याखोऱ्यांत ते वावरत होते. घनदाट जंगलांतून ते नित्य हिंडत होते. उगीच नव्हते ते इतके चपळ, काटक आणि धीट. अंगानें ते शिडशिडीत खरे, पण एक एक मराठा तीस-चाळीस बोजड अंगाच्या मुसलमान सैनिकांना सहजासहजीं दमवीत असे. गनिमी कावा मराठ्यांनीं स्वीकारला तो याच त्यांच्या गुणांमुळें !

अशा मराठी सैनिकांना किल्ल्यांइतकें सुरक्षित आश्रयस्थान दुसरें कोणतें असणार ? मराठ्यांचा पाडाव होत नाहीं याला हें एक कारण असावें असें औरंगजेबाला आतां वाटूं लागलें. मराठ्यांना जिंकण्याचे थोडे का प्रयत्न त्यानें केले होते ? शिवाजी महाराजांच्या वेळेपासून तो आपले सामर्थ्य मराठ्यांवर लोटीत होता. पण तें सर्व वायां गेलें होतें. मराठ्यांचा पाडाव तर झाला नाहींच, उलट त्यांचेंच बळ जास्त वाढलें. तसें नसतें तर शिवाजी महाराजांच्या मृत्यूबरोबर त्यांचें स्वराज्यहि संपलें असतें. संभाजी राजांच्या वधानें मराठ्यांचीं मनेंहि मेलीं असतीं. राजारामाच्या अकालीं मृत्यूमुळें महाराष्ट्र अनाथ आणि दुबळा झाला असता. तसें कांहीं झालें असतें तर बादशहाला

लाखोगणती सैन्य घेऊन महाराष्ट्रांत येऊन रहाण्याची गरजच उरली नसती. पण मराठ्यांचे लागोपाठ तीन नेते गेले, तरी मराठ्यांची हिंमत खचली नाहीं. त्यांच्या तलवारीचें तिखट पाणी आटलें नाहीं. उलट त्यांची हिंमत वाढली, त्यांच्या तलवारीचें पाणीहि अधिक जहाल झालें.

तरीपण बादशहाची समजूत अशी कीं, मराठ्यांचें बळ त्यांच्या मनगटांपेक्षां त्यांच्या किल्ल्यांतच आहे. ते किल्ले घेतले कीं मराठे आपलीं मनगटें कडाकडा चावीत बसतील! बस्, आतां हाच एक उपाय! मराठ्यांच्या किल्ल्यांवर आपली अफाट



फौज तुफानी लाटांप्रमाणें जाऊन आदळली कीं ते आपोआप शरण येतील! जातात कुठें?

बादशहाचा हा गर्व अगदींच पोकळ होता. त्याच्यापाशीं अमाप सैन्य होतें हें खरें, पण तें किल्ले जिंकण्याला अगदीं निरुपयोगी होतें. मराठे विजेच्या चपळाईनें पळत तर बादशाही सैनिक गोगलगायींच्या गतीनें चालत. त्यांचीं तीं पुष्ट शरीरें डोंगराळ प्रदेशांत काय लढणार! तरीपण बादशहानें आतां नक्की ठरविलें कीं मराठ्यांचे किल्लेच घ्यायचे.

त्या प्रचंड मोहिमेची पूर्वतयारी पुरी झाली. सर्व सैन्य सज्ज झालें. तोफखाना व त्यावरील गोलंदाज खडे राहिले. घोडदळांतील घोडे फुरफुरूं लागले. हत्तीखाना हलूं लागला. सेनापति आपआपल्या दलांना हुकूम सोडूं लागले. आणि बादशहाचा रत्नजडित हत्ती उभा राहिला. वर अंबारींत बसलेल्या बादशहानें हातानेंच खूण केली. सेनासागर निघाला.

मराठ्यांच्या किल्ल्यांच्या कानांत वारा गुणगुणला, ‘ बादशहाची अफाट सेना चाल करून येत आहे, सावध!’

कबुतरांचा कळप किल्ल्यांच्या कानांत कुजबुजला, ‘ बादशहा मराठ्यांचे सारे किल्ले जिंकणार आहे. मराठ्यांचे हे प्राण हिरावून घेणार आहे. प्रतिकाराच्या तयारींत असा!’



सांडणीस्वार थैली घेऊन आले. किल्लेदारांनीं थैली उघडली. खलित्यांत लिहिलें होतें :

> “ स्वराज्यावर शेवटचा प्रहार करण्याच्या इराद्यानें बादशहा निघाला आहे. सारी शक्ति एकवटून तोंड द्या. यश देण्यास श्री समर्थ आहे.”

किल्ले व मराठे तयारींतच होते. सर्व किल्ल्यांवर भरपूर दारूगोळा होता. पुरेशी धान्यसामग्री होती. स्वराज्याच्या रक्षणाचें कंकण हातीं बांधलेले हशम होते. आणि किल्ल्याच्या आणि स्वराज्याच्या रक्षणासाठीं स्वतःच्या छातीचा कोट करण्यास सदैव सिद्ध असलेला किल्लेदारहि होता. बस्, यापेक्षां अधिक काय हवें होतें किल्ल्यांवर!

याउलट होती बादशहाची स्थिति होती. त्याच्यापाशीं अफाट सैन्य होतें. प्रचंड तोफा होत्या. त्या वाहून नेण्यासाठीं हजारों हत्ती, उंट व बैल होते. दारूगोळ्याचा प्रचंड सांठा होता. तोफा डागणारे कुशल गोलंदाज अगणित होते. उमद्या अरबी घोड्यांचें अमाप घोडदळ होतें. अनेक लढायांत भाग घेऊन नांवलौकिक मिळविलेले एकापेक्षां

एक वरचढ असलेले असंख्य बलाढ्य सरदार होते. आणि या सर्व सामर्थ्याचा मन मानेल तसा उपयोग करणारा क्रूर नि विलंदर बादशहा होता !

अगदीं विषम सामना होता हा ! तरीहि मराठ्यांचें पारडें जडच होतें. बादशहाचें हलकें होतें. असें कां ?

याचें उत्तर एकच—मराठ्यांच्या पारड्यांत सात्त्विक निष्ठेचें तुळशीपत्र होतें. बादशहाच्या पारड्यांत तेवढेंच कमी होतें.

दि. १९ ऑक्टोबर १६९९ या दिवशीं बादशाही फौजेनें ब्रह्मपुरीची छावणी सोडली. मराठ्यांच्या किल्ल्याची रांगच रांग बादशहाच्या डोळ्यासमोर उभी होती. कराडजवळच्या वसंतगडा-पासून त्याची ही किल्ले जिंकण्याची मोहीम सुरू झाली आणि शेवटीं वाकिनखेडयाला संपली. उणींपुरीं सहा वर्षें या मोहिमेच्या पायीं खर्ची झालीं असतील. पण बादशहाला शेवटीं कमाई काय झाली ? किती किल्ले त्यानें जिंकले ?

शून्य ! होय शून्य ! एकहि किल्ला त्यानें जिंकला नाहीं. त्याला जिंकतां आला नाहीं. एकहि किल्ला त्याच्या पदरांत पडला नाहीं. मराठ्यांच्या स्वराज्याच्या भक्कम इमारतीचा एक टवकाहि उडवतां आला नाहीं त्याला.

मग त्याच्या त्या मोहिमेचें काय झालें ? त्यानें लागोपाठ दहा किल्ले घेतले तें काय खोटेंच ? त्यानें हवेंतलेच किल्ले घेतले असें तर तुम्हांला म्हणायचें नाहीं ना ?

नाहीं; तसें कांहीं म्हणायचें नाहीं. बादशहानें मराठ्यांचे किल्ले जिंकण्यासाठीं टाकलेलें पाऊल त्याच्या दृष्टीनें पुढेंच पडत होतें. पण ती त्याची फसवणूक होती. दहा मोठे किल्ले त्याच्या ताब्यांत आले खरे. परंतु त्यांपैकीं हल्ला करून लढून घेतला असा फक्त तोरणा किल्लाच. बाकीच्या सगळ्या किल्ल्यांना त्याच्या फौजेनें वेढा दिला. चारसहा महिने तो वेढा चालला. पण त्यानंतर जादूची कांडी फिरल्याप्रमाणें प्रत्येक किल्ला आपोआप बादशहाच्या ताब्यांत येऊं लागला. हें असें घडलें कसें ?

त्याचें असें झालें. छत्रपति राजाराम नुकतेच मरण पावले होते. संताजीसारखा धुरंधर सेनानी चार वर्षांपूर्वींच फितुरीला बळी पडला होता. मराठ्यांच्या स्वराज्याचीं सूत्रें महाराणी ताराबाई हिच्या हातीं आलीं होतीं. परिस्थिति मराठ्यांना सर्व बाजूंनीं प्रतिकूल होती. तरीपण ताराबाईच्या तडफदार मुत्सद्देगिरीमुळें मराठ्यांचें पाऊल मुळींच मागें पडलें नाहीं. उलट मराठ्यांचे पराक्रम दिवसें-दिवस वाढतच गेले.

ताराबाईनें सर्व किल्लेदारांना एक मंत्र देऊन ठेवला; तो असा : " बादशाही फौजांनीं किल्ला वेढला तर तो तुम्ही कांहीं काळ लढवावा. पण त्यानंतर शरण आल्याचा बहाणा करून वेढा देणाऱ्या सेना-पतीकडून भरपूर लांच घ्यावी आणि किल्ला त्याच्या ताब्यांत द्यावा. किल्ल्यावरचें तुमचें सैन्य तुम्ही मागील दारानें बाहेर काढावें व तें सुरक्षित ठिकाणीं लपवून ठेवावें. किल्ला ताब्यांत आल्याचें पाहतांच मोंगलांची फौज पुढें निघून जाईल आणि किल्ल्यावर फक्त मोजकेच लोक रहातील. अशा वेळीं योग्य संधि पाहून आपलें सैन्य किल्ल्यांत घुसवावें आणि किल्ला पुन्हां ताब्यांत घ्यावा."

या मंत्राचा उपयोग सर्व किल्लेदारांनीं केला. अर्थात् बादशाही सैन्याला मराठ्यांच्या तलवारीचें पाणीहि मराठ्यांनीं भरपूर पाजलें. तसें नसतें तर लांच देऊन किल्ले घ्यावेच लागले नसते. आपल्या मनगटांतल्या जोरावर ते त्यांनीं घेतलेच असते. पण मराठ्यांनीं त्यांना इतकें हैराण केलें कीं, किल्लेदाराला लांच देऊन किल्ला घेणें ह एकच मार्ग त्यांच्यापुढें शिल्लक होता. शिवाय किल्ला लवकर घेण्याचा बादशहाचा सारखा लकडा लागलेला होता. अशा स्थितींत ते बिचारे सेनापति तरी दुसरें काय करणार ?

साताऱ्याच किल्ल्याचें उदाहरण पहा. साताऱ्याचा किल्लेदार प्रयागजी आनंद यानें हा किल्ला चार महिनेपर्यंत अतिशय निकरानें लढविला. किल्ल्याच्या एका बाजूस बादशहाचा मुलगा आजमशहा आणि दुसऱ्या बाजूस तर्बियतखान व सर्जाखान हे दोन बडे सेनापति

किल्ल्याला मोर्चे लावून बसलेले. किल्ल्याची सर्व बाजूंनीं नाकेबंदी करण्यांत आली. प्रचंड तोफा किल्ल्यावर डागण्यांत आल्या. पण किल्लेदार डगमगला नाहीं. त्यानें किल्ल्यावरून मोठमोठे दगड शत्रूच्या अंगावर लोटले आणि गोळ्यांचा वर्षाव करून त्यानें त्यांस जेरीस आणलें. वेढ्याच्या बाहेर धनाजी जाधव आणि हणमंतराव



निंबाळकर यांनीं वेढ्यांतील सैनिकांवर छापे घालून त्यांना हैराण केलें. ह्या छाप्यांत त्यांनीं इखलासखान व त्याचा मुलगा यांस ठार मारलें आणि झुल्फिकारखानाचेहि असंख्य लोक ठार मारले. बादशाही सैनिकांना बाहेरून मिळणारी सारी रसद त्यांनीं लुटली. त्यामुळें वेढ्यांतील सैनिकांची उपासमार होण्याची पाळी आली. गंमत अशी कीं, या वेढ्याचीं सर्व सर्व सूत्रें स्वतः बादशहाच्या हातीं होतीं आणि तो वेढ्यापासून जवळच तळ देऊन सारें कांहीं समक्ष पहात होता.


असे कांहीं दिवस गेल्यानंतर मोंगलांनीं मंगळाईच्या बुरजाखालीं दोन मोठे सुरुंग तयार केले. किल्ल्यावरच्या लोकांना त्याची कांहीं माहिती नव्हती. सुरुंग उडतात कसे हें पाहण्यासाठीं बादशहाची स्वारीसुद्धां मोठ्या थाटानें बाहेर आली होती. बादशहाची स्वारी पाहण्यासाठीं किल्ल्यावरचे लोक दाटीवाटीनें बुरुजावर उभे होते! सुरुंगाला बत्ती देण्यांत आली— आणि केवढा हाहाकार उडाला! डोंगराचा एक भला मोठा खडक त्या बुरुजासह वर

आकाशांत उडाला त्याचा कांहीं भाग किल्ल्यांत पडला आणि कांहीं भाग किल्ल्याच्या बाहेर पडला. किल्ल्याच्या बाहेर पडलेल्या दगडांच्या राशीखालीं असंख्य मोंगल सैनिक गाडले गेले. किल्ल्याच्या बुरजावर जमलेली ती मंडळी स्फोटाबरोबर उंच उडाली आणि छिन्नविच्छिन्न होऊन खालीं पडली. मोंगलांचे आणि मराठ्यांचे दोघांचेहि शेंकडों सैनिक ह्या स्फोटांत ठार झाले. खरें म्हणजे बादशहाचा मुलगा आजमशहा हाहि त्यांत सांपडायचा; पण त्याचा काळ आला असला, तरी वेळ आली नव्हती! खडकांतली एक प्रचंड शिळा त्याच्या पायाशीं येऊन पडली, तिनें तो भयंकर भेदरून गेला. ह्या स्फोटानें गडावरचे मराठे शरण येतील असें मोंगलांना वाटत होतें. पण झाली गोष्ट इतकी अघटित होती, भयंकर होती कीं मोंगलांना पुन्हां त्या किल्ल्यावर हल्ला करण्याचा धीरच होईना!.

शेवटीं नाइलाज होऊन आजमशहानें किल्लेदाराशीं आंतून 'तें' बोलणें सुरू केलें. आणि रोख वीस हजारावर हा सौदा पटला. साताऱ्चा किल्ला मराठ्यांनीं सोडला आणि तो मोंगलांच्या ताब्यांत आला. आपल्या मुलानें कोणती करामत केली तें बादशहाला कधींच कळलें नाहीं. पण आपल्या मुलानें कांहींतरी पराक्रम करून हा किल्ला मिळविला असें समजून बादशहानें किल्ल्याला 'अजिमतारा' असें नांव दिलें.

याच मार्गानें परळी, पन्हाळा, पावनगड, वर्धनगड, विशाळगड, सिंहगड आणि राजगड हे किल्ले मोंगलांनीं लागोपाठ सर केले; आणि एकामागोमाग एक गमावलेहि! असे हे किल्ले जिंकीत जिंकीत बादशहा वाकिनखेड्यापर्यंत आला.

वाकिनखेडचाचा प्रदेश विजापूरच्या पूर्वेला कृष्णा आणि भीमा या नद्यांच्या दुआबांत आहे. या प्रदेशावर फार पूर्वींपासून बेरड लोकांची सत्ता होती. शिवाजी महाराजाच्या वेळीं पेमजी नाईक या पुढाऱ्यानें स्वराज्यांत सामील होण्याची शपथ घेतली. तेव्हांपासून हें छोटेखानी राज्य मराठ्यांच्या स्वराज्यांतच सामील झालें होतें.



वाकिनखेडें हा छोटासा किल्ला. एक गढीच म्हणा ना. —पण किल्ला अतिशय मजबूत होता. त्यावर राहणारे बेरड गडकरी हे खरोखरीच बेडर वृत्तीचे होते. म्हणूनच या किल्ल्याचें स्वातंत्र्य अबाधित राहिलें.

औरंगजेबानें वेढा दिला, तेव्हां पिराजी नाईक हा वाकिनखेड्याचा किल्लेदार होता. ह्या किल्ल्यावर प्रहार करण्यासाठीं बादशहानें शाहजादा कामबक्ष, हमीदुद्दीनखान, तर्बियतखान यांसारख्या मातबर सरदारांची नेमणूक केली होती. पिराजी नाईकानें आपला बंदोबस्त चांगलाच केला होता. धनाजी जाधवाचें व त्याचें चांगलें सख्य होतें. जाधवाचीं मुलें-माणसें वाकिनखेड्यालाच रहात होतीं. तेव्हां बादशहानें वाकिनखेड्याला वेढा दिल्याची बातमी धनाजीला कळतांच तोहि आपलें सैन्य घेऊन नाईकाच्या मदतीला आला. नाईकानें किल्ल्यांतून मोंगल सैनिकांवर तुफान मारा चालविला होता. आणि तिकडून धनाजी जाधवाच्या पथकानें पिछाडीच्या बाजूनें जोरदार हल्ला चढविला. त्यामुळें बादशाही फौजेचा गोंधळ उडाला व तिची पळापळ सुरू झाली. या पळापळींत मोंगलांचे असंख्य सैनिक मारले गेले.

बादशहाला ही हकीकत समजली, तेव्हां तो खूपच चवताळला. एवढ्याशा गढीच्या नाईकानें शाहजादा कामबक्षासारख्या बलाढ्य सरदाराचा पाडाव करावा, या गोष्टीची त्याला अतिशय चीड आली. पण रागारागानें हाताचीं बोटें मोडण्यापलीकडे तो करतो काय ? नाईकाला



आणि मराठ्यांना लाखोली वहात त्यानें झुल्फिकारखान व दाऊदखान पन्नी या प्रसिद्ध सरदारांना शहाजाद्याच्या मदतीला पाठविलें. मोंगल सैन्याला एवढी मोठी कुमक येत असलेली पाहून पिराजी नाईकानें बादशहाला चकविण्यासाठीं एक सुंदर नाटक रचलें. त्यानें आपला भाऊ सोमशंकर यास तावडतोब बादशहाच्या भेटीस पाठविलें. सोमशंकर पक्का नाटकी होता. बादशहापुढें गेल्याबरोबर प्रथम त्यानें त्याच्यापुढें लोटांगण घातलें. आणि तो बादशहाला केविलवाणेपणानें म्हणाला, "खाविंद, आपण मला अभय दिल्याखेरीज मी उठणार नाहीं! माझा भाऊ पिराजी यानें आपला भयंकर अपराध केला आहे. पण आपण माझ्यावर राग धरूं नका. तो माझा भाऊ नव्हेच, वैरी आहे वैरी!"

बादशहाला हें सारें खरेंच वाटलें. पिराजीला पकडून द्यायला सोमशंकर तयार आहे, हें पाहून भावाभावांतल्या ह्या यादवीचा फायदा घेण्याचें त्यानें ठरविलें. सोमशंकरनें किल्ला बादशहाच्या स्वाधीन करण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें किल्ला ताब्यांत घेण्यासाठीं बादशहाचे कांहीं सरदार व सैनिक सोमशंकरच्या बरोबर किल्ल्यावर गेले. सोमशंकरनें किल्ला त्यांच्या स्वाधीन केला. पिराजीला त्यानें पकडून द्यावयाचें कबूल केलें होतें. पण पिराजी कुठें सांपडलाच नाहीं. तो कुठें दडी मारून बसला होता कोण जाणें! कोण जाणे कशाला? तो कुठें होता हें त्याला स्वतःला आणि सोमशंकरला चांगलेंच माहीत होतें!

असे दोन तीन दिवस गेले. बादशहाचें मोठें सैन्य देवापूरच्या वाटेला लागलें. वाकिनखेड्यापासून तें बरेंच दूर गेलें असें पाहून पिराजी नाईक अचानक किल्ल्यांत आला. आपल्या साथीदारांच्या मदतीनें त्यानें मोंगल सरदारांना अटकेंत ठेवलें आणि सैनिकांची कत्तल करून टाकली. बादशहा देवापूरला पोंचला तेव्हां त्याला ही वार्ता समजली. तो खूपच संतापला. त्यानें पुन्हां आपलें कांहीं सैन्य वाकिनखेड्यावर रवाना केलें. पण धनाजी जाधवाच्या सैन्यानें त्याला वाटेंतच गांठून भरपूर चोप दिल्यामुळें तें परत गेलें.

अशा तऱ्हेनें बादशहानें मराठ्यांच्या स्वराज्यावर केलेला हा शेवटचा प्रहार अगदींच फुकट गेला; नव्हे, बादशाहीवरच उलटला! बादशहा हतबुद्ध झाला. अत्यंत निराश होऊन तो विचार करूं लागला. 'काय मिळविलें आपण ह्या खटाटोपांत? कांऽऽहीं नाहीं!' वसंतगडापासून वाकिनखेड्यापर्यंत जिंकलेले दहाहि किल्ले मराठ्यांनीं पुन्हां जिंकून घेतले.

बादशहाची सर्व लोकांत फजिती झाली. जो तो त्याची टर उडवूं लागला. जे सेनापति त्याला चळचळां कांपत तेच आतां त्याच्या तोंडावर त्याची टिंगल करूं लागले. बादशहा ह्या प्रकारामुळें जास्तच चिडला आणि त्यानें सक्त हुकूम काढला कीं, 'आपल्या कृत्याबद्दल जो कोणी चकार शब्द काढील, त्याला देहान्ताची शिक्षा मिळेल!' ह्या भयंकर हुकुमामुळें लोकांचीं तोंडें खरोखरीच बंद झालीं. इतकीं कीं एवढी प्रचंड फौज देवापुराहून अहमदनगरला गेली ती अगदीं मुक्यानेंच चालत गेली रणवाद्यें सुद्धां बंद होतीं!




याहि अवस्थेचा मराठ्यांनीं चांगलाच फायदा घेतला. बादशहाचें सैन्य अहमदनगरला पोंचण्याचे आंतच मराठ्यांनीं पाठीमागून

व त्याच्या सैन्यावर जोरदार हल्ला चढविला. अचानक आलेल्या धोळधाडीमुळें मोंगल सैनिकांची दाणादाण उडाली. मराठ्यांची ी इतकी जोरदार होती कीं ते थेट बादशहाच्या तंबूपर्यंत त गेले आणि त्यांनीं बादशहाच्या डोळ्यादेखत त्याच्या ारांवर सैनिकांना कंठस्नान घातलें. लढाईंत बादशहाचा एक प्रबळ ापतीहि मराठ्यांच्या हातीं आला होता. त्याच्याकडून पांच लक्ष दंड घेऊन त्यांनीं त्यास सोडून दिलें. यावेळीं बादशहा सुद्धां ांच्या हातीं सहज सांपडला असता. पण मराठे म्हणाले, ाला मारण्यापासून आमचा फायदा नाहीं. तो जिवंत ोंच आमचा धंदा चांगला चालतो!"

ासा हा बादशहानें मराठेशाहीवर केलेला शेवटचा प्रहार ावरच उलटला!

म. सं. रां. ठाणे, वाचनालय शाखा.
बाल वाङ्मय विभाग
वा. क्र. ९८०६ दिनांक ९२।९।८६
विषय पा.वा. क्र. .........



BVBK-0401876